राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सय्यद मोईजोद्दीन सय्यद एहतेशामोद्दीन, घर नं. २-१-८८, काझीवाडा, व्ही. आय. पी. रोड, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, तलत उर्दू हायस्कूल, बारुदगरनाला, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. विनोद गोपीनाथ कोरके, : अपीलकर्ता
रा. विटखेडा, पैठण रोड, औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना

जन अपिलीय अधिकारी तथा :
अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१७५० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०२-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - प्रतिनिधी श्री. ई. इतिराज, शाखा अभियंता | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - प्रतिनिधी श्री. बी. आर. राणे, सहायक अधीक्षक अभियंता | : | उपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष - श्री. श्रीनिवास काळे, शाखा अभियंता | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ३०-०९-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १६-१०-२००८ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८-११-२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २२-१२-२००८ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३-०३-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधींचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांची बाजू त्यांच्या

प्रतिनिधीमार्फत मांडण्यात आली. अपिलार्थी उपस्थित नसल्यामुळे त्यांचे म्हणणे आयोगास अवगत झाले नाही.

अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ३०-०९-२००८ रोजीच्या अर्जान्वये श्री. श्रीनिवास काळे, शाखा अभियंता यांनी जालना व भोकरदन या भागात केलेल्या रोजगार हमी योजना कामांची यादी व मजूर उपस्थिती अहवाल तसेच हजेरीपटांच्या छायांकीत प्रतीची मागणी केली होती.

जन अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर निर्णय देताना दिनांक २२-१२-२००८ रोजी अपिलार्थीने मागितलेली संपूर्ण माहिती त्यांना १५ दिवसाच्या आत विनामूल्य द्यावी असा निर्णय दिला होता त्याची अंमलबजावणी जन माहिती अधिका-यामार्फत झालेली नाही.

आज रोजी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास असे सांगितले की, रोजगार हमी योजना कामांची यादी व मजूर उपस्थितीचा अहवाल त्यांच्याजवळ आता तयार आहे व ते अपिलार्थीस ही माहिती देऊ शकतात. मजुरांचे हजेरीपटांची संख्या अंदाजे २५० इतके होईल व त्यांच्याकडे झेरॉक्ससाठी निधी उपलब्ध नाही त्यामुळे हजेरीपटाच्या झेरॉक्स देता येणे शक्य झाले नाही. तथापि जन माहिती अधिकारी यांचा हा युक्तिवाद आयोगास मान्य करता येत नाही. अपिलार्थीने टपालाव्दारे माहिती मागितली होती. तसेच अपीलकर्ता यांनी कार्यालयात ब-याच चकरा मारल्या होत्या पण त्यांना माहिती देण्यात आली नाही असे प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या निर्णयामध्ये म्हटले आहे. या सर्व बाबी विचारात घेता तसेच माहिती पुरविण्यासाठी झालेला विलंब पाहता जन माहिती अधिका-यास हजेरीपटाच्या झेरॉक्स प्रती हा माहिती अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी लागेल आणि याकरिता येणारा सर्व खर्च जन माहिती अधिकारी व या प्रकरणाशी संबंधित सहायक जन माहिती अधिकारी यांच्याकडून जबाबदारीनुसार वसूल करणे आवश्यक आहे.

या सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

१. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागितलेल्या संपूर्ण माहितीच्या झेरॉक्स प्रती अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पुरवाव्यात.

२. अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद यांनी वर नमूद केल्याप्रमाणे येणारा सर्व खर्च जन माहिती अधिकारी व ज्या अधिकारी / कर्मचा-यांनी माहिती देण्यासाठी विलंब लावला त्या सर्वांकडून जबाबदारीनुसार प्रमाण निश्चित करुन वसूल करण्यात यावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०२-१२-२०१०**

-------------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. विनोद गोपीनाथ कोरके, रा. विटखेडा, पैठण रोड, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. तारेख गुलाम मुस्तफा बाययुनूस, : अपीलकर्ता
व्दारा : डॉ. मझर मोईयोद्दीन, प्लॉट नं. ३, मौलाना आझाद
हौसिंग सोसायटी, हिमायतबाग चौक, औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
विशेष भूसंपादन अधिकारी, जायकवाडी प्रकल्प,
औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००८/रामाआ/अपील/सिआर/२२३५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०२-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. तारेख गुलाम मुस्तफा बाययुनूस व ॲड वाजेदखान | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - प्रतिनिधी एम. एन. रणदिवे, अव्वल कारकून | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३-०५-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २६-०५-२००८ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१-०६-२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १५-०७-२००८ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७-०८-२००८ फेरसादर दिनांक |

२९-०५-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी त्यांच्या वकिलासह आणि जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. एम. एन. रणदिवे, अव्वल कारकून हे उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित नाहीत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. एम. एन. रणदिवे, यांनी सुनावणीची तारीख वाढवून मिळावी अशी आयोगास विनंती केली. त्यांची ही विनंती मान्य करण्यात येऊन सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणी दिनांक ०६-०१-२०११ रोजी सकाळी ११-०० वाजता ठेवण्यात येत आहे. पुढील सुनावणीस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी स्वतः उपस्थित राहावे.

**अंतरीम आदेश**

पुढील सुनावणी दिनांक ०६-०१-२०११ रोजी सकाळी ११-०० वाजता ठेवण्यात येत आहे. पुढील सुनावणीस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी स्वतः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०२-१२-२०१०** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. तारेख गुलाम मुस्तफा बाययुनूस, व्दारा : डॉ. मझर मोईयोद्दीन, प्लॉट नं. ३, मौलाना आझाद हौसिंग सोसायटी, हिमायतबाग चौक, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा विशेष भूसंपादन अधिकारी, जायकवाडी प्रकल्प, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. जाफर हुसेन कमाल पिता गुलाम हुसेन, : अपीलकर्ता
घर नं. १-१४-९६, देवडी बाजार, औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मुख्य कार्यकारी अधिकारी, वक्फ मंडळ, पानचक्की,
औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ,
पानचक्की, औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००८/रामाआ/अपील/सिआर/२२३३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०२-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. जाफर हुसेन कमाल पिता गुलाम हुसेन | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३-०४-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०२-०७-२००८ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०२-०६-२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २०-०६-२००८ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५-०७-२००८ रोजीचे फेरसादर दिनांक ३०-११-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित नसल्यामुळे सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीस जन माहिती अधिकारी यांनी स्वतः तसेच जन अपिलीय अधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद यांनी स्वतः सुनावणीस उपस्थित राहणे आवश्यक राहील.

**अंतरीम आदेश**

सुनावणी पुढे ढकलण्यात आली आहे. पुढील सुनावणी दिनांक ०६-०१-२०११ रोजी सकाळी ११-०० वाजता घेण्यात येईल त्यावेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद यांनी स्वतः (जन अपिलीय अधिकारी वेगळे असतील तर) उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०२-१२-२०१०** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. जाफर हुसेन कमाल पिता गुलाम हुसेन, घर नं. १-१४-९६, देवडी बाजार, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, वक्फ मंडळ, पानचक्की, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पानचक्की, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. संतोष नाना जाधव, : अपीलकर्ता
मु. पो. आंबेलोहळ, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, आंबेलोहळ,
तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, गंगापूर,
तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१७८० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०२-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. संतोष नाना जाधव | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, आंबेलोहळ - श्री. नानासाहेब गमनराव रीहंज | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, गंगापूर, जिल्हा औरंगाबाद - श्रीमती रंजना एल. राठोड | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २८-०९-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | निरंक |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६-१०-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | निरंक |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७-१२-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, अपिलार्थीने मागितलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असल्यामुळे ती एकत्र करुन देण्यासाठी त्यांना वेळ लागला. त्यांनी अपिलार्थीस दोन टप्प्यामध्ये माहिती दिली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी प्रकरणात दिनांक २०-११-२००९ रोजी सुनावणी घेतली होती व एक महिन्याच्या आत विनामूल्य माहिती देण्याचा निर्णय दिला होता. अपिलार्थीने आयोगास उद्देशून लिहिलेल्या त्यांच्या दिनांक ३०-०७-२०१० रोजीच्या पत्रामध्ये या प्रकरणाशी संबंधित मूळ अर्जाव्दारे त्यांनी मागणी केलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली असून प्राप्त माहिती संदर्भात त्यांची तक्रार नसल्याचे नमूद केले आहे. आज रोजी अपिलार्थीने ही बाब आयोगासमोर मान्य केली आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०२-१२-२०१०** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. संतोष नाना जाधव, मु. पो. आंबेलोहळ, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, आंबेलोहळ, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती कार्यालय, गंगापूर, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. मोहम्मद अब्दुल अजीज इंजिनिअर, : अपीलकर्ता
घर नं. १-१५-५०, नेहरु भवन जवळ, बुढ्ढीलेन,
औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१७७३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०२-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. मोहमद अब्दुल अजीज इंजिनिअर, | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, परभणी श्री. बाबाराव भागुजी सोनवणे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, परभणी श्री. गजानन शंकर खाडे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १५-०८-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | निरंक |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २७-१०-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | निरंक |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १४-१२-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले की, त्यांनी अपिलार्थीस दिनांक १५-०१-२०१० रोजी नोंदणीकृत डाकेने माहिती पाठविली आहे त्याची पोच त्यांच्या नस्तीवर आहे.

अपिलार्थी यांनी सांगितले की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती मिळाली नाही.

जन अपिलीय अधिकारी हे या कार्यालयात कार्यकारी अभियंता आहेत त्यांनी स्वतः या प्रकरणात लक्ष घालून अपिलार्थीने मागितलेल्या सर्व माहितीच्या प्रती प्रमाणित साक्षांकीत करुन अपिलार्थीस द्याव्यात असे आयोगाचे मत आहे.

या सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागितलेल्या सर्व माहितीच्या प्रमाणित साक्षांकीत प्रती अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत नोंदणीकृत डाकेने पुरवाव्यात.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०२-१२-२०१०** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मोहमद अब्दुल अजीज इंजिनिअर, घर नं. १-१५-५०, नेहरु भवन जवळ, बुढ्ढीलेन, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,

परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. ममराज बन्सी राठोड,<br>रा. जंगलातांडा, तालुका सोयगाव, जिल्हा औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>उप अभियंता, (सिंचन विभाग) उपविभागीय कार्यालय,<br>सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद सिंचन विभाग,<br>औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१७७१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०२-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - श्री. दत्तात्रय किशन गवळे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी = श्री. रावसाहेब मिराजी वाघमारे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १५-०७-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०४-०८-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१-१०-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ११-११-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १४-१२-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले की, अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांना देण्यात आलेली आहे परंतु अपिलार्थीस दिलेल्या माहितीची प्रत त्यांच्या नस्तीवर आज रोजी ते आयोगास दाखवू शकले नाहीत. तथापि दिनांक २३-११-२००९ रोजी त्यांच्या कार्यालयातील कनिष्ठ अभियंता यांनी अपिलार्थीस दिनांक २७-११-२००९ रोजी कार्यालयात येऊन माहिती घेऊन जावी असे कळविले होते याबाबतचा पुरावा आयोगास दाखल केला त्यावर अपिलार्थीची सही आढळून येते. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांनी दिनांक ११-११-२००९ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थी यांनी रुपये १९६ एवढे शुल्क जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरुन जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त करुन घ्यावी किंवा शुल्क भरल्यावर उशिरात उशिरा दहा दिवसाच्या आत माहिती द्यावी असा निर्णय दिला आहे.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित नाहीत त्यामुळे त्यांची बाजू आयोगापुढे मांडण्यात आली नाही. आयोगापुढे आज अपिलार्थीच्या दिनांक १९-११-२०१० रोजीच्या पत्राची प्रत आहे. त्यामध्ये अपिलार्थीने त्यांना माहिती प्राप्त झाली असून विचाराधीन अपील रद्द करावे अशी आयोगास विनंती केली आहे.

या सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०२-१२-२०१०** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. ममराज बन्सी राठोड, रा. जंगलातांडा, तालुका सोयगाव, जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, (सिंचन विभाग) उपविभागीय कार्यालय,

सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद सिंचन विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. बाळासाहेब म्हस्के, : अपीलकर्ता
राहुलनगर, रेल्वेस्टेशनजवळ, विनर बेकरीसमोर,
औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,
औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,
औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१७७० | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०२-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०८-०९-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १६-०९-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १५-१०-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | निरंक |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २१-१२-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी कोणीही उपस्थित नाहीत.

आयोगापुढे असलेल्या कागदपत्रावरुन असे दिसते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०८-०९-२००९ रोजीच्या अर्जाव्दारे सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद अंतर्गत एप्रिल २००८ ते अर्ज दाखल करेपर्यंतच्या दिनांकाच्या कामकाजाबाबतची विस्तृत माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद यांनी

त्यांच्या दिनांक १६-०९-२००९ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस कळविले होते की, दिनांक ०१-०९-२००८ पासून त्या त्या उपविभागाचे उपअभियंते शासकीय माहिती अधिकारी म्हणून नियुक्त केले आहेत. तेव्हा आपणास त्यांच्याकडून माहिती उपलब्ध होऊ शकेल. तसेच ही बाब उप विभाग, उत्तर / दक्षिण /फुलंब्री मु. औरंगाबाद/यांत्रिकी उपविभाग/बांधकाम उपविभाग क्रमांक १, औरंगाबाद/पैठण/ सिल्लोड/फर्दापूर यांना कळविली आहे. अपिलार्थीस आजपर्यंत माहिती उपलब्ध झाल्याचे कागदपत्रावरुन आढळून येत नाही. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलाची सुनावणी घेतलेली दिसत नाही. या परिस्थितीत जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलाची सुनावणी घेणे आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद यांनी आयोगाचे हे आदेश प्राप्त होताच अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर १५ दिवसाच्या आत सुनावणी घेऊन त्यावर आपला निर्णय पारीत करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०२-१२-२०१०** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बाळासाहेब म्हस्के, राहुलनगर, रेल्वेस्टेशनजवळ, विनर बेकरीसमोर, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. रमेश मारुतीराव गायकवाड, पोलीस उप निरीक्षक, विशेष सुरक्षा विभाग, औरंगाबाद | : | अपीलकर्ता |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| जन माहिती अधिकारी तथा विशेष पोलीस महानिरीक्षक, औरंगाबाद परिक्षेत्र, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा वाचक पोलीस उप अधीक्षक, कार्यालय विशेष पोलीस महानिरीक्षक, औरंगाबाद परिक्षेत्र, औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१७५७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०२-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक - श्री. एस. बी. पवार | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा वाचक पोलीस उप अधीक्षक - श्री. एस. एस. जाधव | : | उपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष - एम. एस. शिंदे प्रमुख लिपीक | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २७-०८-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०९-०९-२००९ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | | दि. १५-०९-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०३-११-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०५-१२-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

या प्रकरणामध्ये आयोगाच्या असे निदर्शनास आणून देण्यात आले आहे की, जन माहिती अधिका-याने विहित मुदतीत माहिती पुरविली आहे. तसेच प्रथम अपिलीय अधिका-याने सुनावणी घेतेवेळी सुध्दा माहिती पुरविली आहे. अपिलार्थीच्या विनंतीनुसार हे प्रकरण श्री. शिंदे, प्रमुख लिपीक यांच्याकडून काढून घेऊन ते श्री. मुंडे यांच्यातर्फे हाताळण्यात आले आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित नाहीत. त्यांनी त्यांच्या व्दितीय अपिलामध्ये त्यांना पुरविलेली माहिती अपूर्ण, दिशाभूल करणारी व चुकीची आहे असे म्हटले आहे. तरी सध्याचे जन अपिलीय अधिकारी तथा वाचक पोलीस उप अधीक्षक यांनी पुन्हा एकदा कागदपत्रांची छाननी करुन ही बाब तपासून पहावी व तसे अपिलार्थीस कळवावे.

या सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०२-१२-२०१०**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रमेश मारुतीराव गायकवाड, पोलीस उप निरीक्षक विशेष सुरक्षा विभाग, औरंगाबाद.
२. जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, कार्यालय विशेष पोलीस महानिरीक्षक, औरंगाबाद परिक्षेत्र, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
३. जन अपिलीय अधिकारी तथा वाचक पोलीस उप अधीक्षक, कार्यालय विशेष पोलीस महानिरीक्षक, औरंगाबाद परिक्षेत्र, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्रीमती शोयबा यासमीन,<br>गुलिस्तान, फाजीलपुरा, औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक, उर्दू माध्यमिक विद्यालय, दौलताबाद,<br>तालुका जिल्हा औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१७५६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०२-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्रीमती शोयबा यासमीन | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - श्री. सय्यद जलिलूर रहेमान | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | उपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष - श्रीमती सय्यदा रफीया शहिनाज | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १९-०६-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १८-०९-२००९, ०१-०९-२००९ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | | दि. २२-०७-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०५-१०-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२-१०-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष उपस्थित आहेत.

दोन्ही बाजूंचे तसेच त्रयस्थ पक्षाचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

या प्रकरणामध्ये आयोगाच्या असे निदर्शनास आणून देण्यात आले आहे की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय दिला आहे व या निर्णयामध्ये अपिलार्थीने माहिती या संज्ञेमध्ये समाविष्ट होणारी माहिती विचारली नसून कारवाई करण्याबाबत, इत्यादी मागणी केली

असल्याचे नमूद करुन प्रथम अपील फेटाळले आहे. या भूमिकेशी सहमती दर्शवित अपिलार्थीचे व्दितीय अपील फेटाळण्यायोग्य आहे या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

आज रोजी जन माहिती अधिकारी यांनी माहिती या व्याख्येमध्ये जी माहिती देय होऊ शकते ती माहिती दिली आहे तसेच यास त्रयस्थ पक्षानेही दुजोरा दिला आहे व या प्रती आयोगासमोर सादर केल्या आहेत.

या सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०२-१२-२०१०**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्रीमती शोयबा यासमीन, गुलिस्तान, फाजीलपुरा, औरंगाबाद.
२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, उर्दू माध्यमिक विद्यालय, दौलताबाद, तालुका जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. नानासाहेब एकनाथ बढे, : अपीलकर्ता
रा. बोरगांव, पो. अंबेलोहळ, तालुका गंगापूर,
जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
ग्रामसेवक / सरपंच, कार्यालय ग्रुप ग्रामपंचायत, सावंगी हर्सूल, अनंतपूर, दायगांव, लासूर स्टेशन, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गंगापूर, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१८०० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. नानासाहेब एकनाथ बढे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत, सावंगी तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद - श्री. शेख मुस्ताक फकिरा | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, गंगापूर, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद - श्री. के. व्ही. शेंगुळे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०६-०६-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | निरंक |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १३-०७-२००९ |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ०३-०८-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २७-१०-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपिलार्थीने दिनांक ०६-०६-२००९ रोजी माहितीसाठी अर्ज केला होता तो जन माहिती अधिकारी यांना दिनांक २१-०७-२००९ रोजी प्राप्त झाला. दरम्यानच्या काळात अपिलार्थीने दिनांक १३-०७-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०३-०८-२००९ रोजी निर्णय दिला. जन अपिलीय अधिका-याने ३० दिवसाच्या आत माहिती द्यावी असे निर्देश जन माहिती अधिकारी यांना दिले. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०७-०८-२००९ रोजी माहितीपोटीचे शुल्क रुपये १४४ इतके भरण्यासाठी पत्र पाठविले. मात्र अद्यापही ते पत्र अपिलार्थीस मिळाले नाही. तथापि या प्रकरणी माहिती देण्यासाठी विलंब झाला असल्याकारणाने विनामूल्य माहिती देणे आवश्यक होते असे आयोगाचे मत आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी आयोगासमोर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस संपूर्ण माहितीचा एक संच दिला तो अपिलार्थीने स्विकारला. अपिलार्थीस ही माहिती अपुरी वाटली तर जन माहिती अधिका-याने उर्वरीत माहितीच्या प्रती त्यांना विनामूल्य द्याव्यात, यास अपिलार्थी व जन माहिती अधिका-यांनी मान्य केले.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-१२-२०१०** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. नानासाहेब एकनाथ बढे, रा. बोरगांव, पो. अंबेलोहळ, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत, सावंगी तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, गंगापूर, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. नानासाहेब महादु डिके,<br>रा. दायगांव, पो. लासूर स्टेशन, तालुका गंगापूर,<br>जिल्हा औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>सहायक वन संरक्षक, वन विभाग, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप वनसंरक्षक, वन विभाग, औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१७८१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी, खुलताबाद, जिल्हा औरंगाबाद श्री. जे. एन. येडलावार | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वन संरक्षक, औरंगाबाद श्री. आर. पी. पाटील | : | उपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष - वन परिक्षेत्र अधिकारी, खुलताबाद | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १७-०१-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | निरंक |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०९-०३-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | निरंक |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०२-०६-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे माहिती उपलब्ध असल्याचे व ते ही माहिती अपिलार्थीस देऊ शकतात असे आयोगास सांगितले. तसेच त्यांनी सुनावणीच्या वेळी एकूण ३५९ पृष्ठांची माहिती आयोगास दाखविली.

जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात सांगितले की, या प्रकरणात प्रथम अपिलावर निर्णय देऊन जन माहिती अधिक-यास माहिती पुरविण्याचा आदेश देण्यात आला होता. तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती देण्यास विलंब झाला आहे असे आयोगास आढळून आले आहे. सध्याचे जन माहिती अधिकारी हे जुलै २०१० पासून कार्यरत आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणाबाबत वेळोवेळी केलेल्या कार्यवाहीबाबतचा तपशील सादर केलेला नाही. कन्झरवेटर ऑफ फॉरेस्ट, औरंगाबाद यांनी या प्रकरणात विलंब का झाला याची पडताळणी करणे आयोगास आवश्यक वाटते. तसेच जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे असलेली अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांना हे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाने विनामूल्य पुरवावी. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित नाहीत त्यामुळे त्यांची बाजू ऐकून घेता आली नाही. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः मागितली होती. तथापि जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असा खुलासा केला की, अपिलार्थी हे माहिती घेण्यासाठी उपस्थित झाले नाहीत.

**आदेश**

१. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे असलेली अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांना हे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाने विनामूल्य पुरवावी.

२. वनसंरक्षक, औरंगाबाद यांनी वर नमूद केल्याप्रमाणे या प्रकरणात अपिलार्थीस माहिती देण्यासाठी विलंब का झाला याबाबत पडताळणी करावी व जे कोणी अधिकारी / कर्मचारी दोषी आढळतील त्यांच्यावर कार्यवाही करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-१२-२०१०** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. नानासाहेब महादु डिके, रा. दायगांव, पो. लासूर स्टेशन, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी, खुलताबाद, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वन संरक्षक, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. वनसंरक्षक, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| नितनवरे पुष्पानंद शंकरराव, | : | अपीलकर्ता |
| जुन्या जिल्हा कोर्टामागे, राज्यमंत्री ॲड प्रितमकुमार शेगांवकर यांच्या बंगल्याशेजारी, लोहिया हॉस्पिटलसमोर, क्रांतीनगर, औरंगाबाद | | |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा | : | उत्तरवादी |
| शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद | | |
| जन अपिलीय अधिकारी तथा | : | |
| अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद | | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१७९३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - प्रतिनिधी श्री. बी. बी. पवार, अधीक्षक | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३-०६-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २४-०६-२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०४-०७-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २९-०८-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २०-११-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास विनंती केली की, या प्रकरणातील तपशील आयोगापुढे सादर करण्यासाठी काही कालावधी लागेल. त्यासाठी काही कालावधी देण्यात यावा. त्याप्रमाणे त्यांची विनंती मान्य करुन सुनावणीची पुढील तारीख देण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद, जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी व्यक्तिशः उपस्थित राहणे आवश्यक राहील कारण अपिलार्थीच्या दिनांक ०३-०६-२००९ रोजीच्या अर्जावर माहिती पुरविण्याची कार्यवाही अद्यापही पूर्ण झालेली नाही.

**अंतरीम आदेश**

सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणी दिनांक ०६-०१-२०११ रोजी सकाळी ११-०० वाजता ठेवण्यात येत आहे. पुढील सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद व जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-१२-२०१०** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. नितनवरे पुष्पानंद शंकरराव, जुन्या जिल्हा कोर्टामागे, राज्यमंत्री ॲड प्रितमकुमार शेगावर यांच्या बंगल्याशेजारी, लोहिया हॉस्पिटलसमोर, क्रांतीनगर, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. विठ्ठल बाबुराव एडके, : अपीलकर्ता
मु. पो. दावरवाडी, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
तहसीलदार, तहसील कार्यालय, पैठण, तालुका पैठण,
जिल्हा औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, तहसील कार्यालय, पैठण, तालुका पैठण,
जिल्हा औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१७९६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. विठ्ठल बाबुराव एडके | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७-०२-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | निरंक |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८-०४-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | निरंक |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११-०६-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थीचा माहितीसाठीचा अर्ज दिनांक १७-०२-२००९ रोजीचा आहे. अपिलार्थीने आयोगासमोर सुनावणीच्या वेळी सांगितले की, त्यांना अजूनही माहिती मिळालेली नाही. ही बाब गंभीर आहे व याची दखल आयोग घेत आहे. यासाठी सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी तसेच तहसीलदार, पैठण व उप विभागीय अधिकारी (महसूल), औरंगाबाद यांनी स्वतः व्यक्तिशः उपस्थित राहणे आवश्यक आहे.

**अंतरिम आदेश**

सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणी दिनांक ०६-०१-२०११ रोजी सकाळी ११-०० वाजता ठेवण्यात येत आहे. पुढील सुनावणीस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी, तहसीलदार, पैठण व उप विभागीय अधिकारी (महसूल), औरंगाबाद यांनी सर्वांनी स्वतः व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-१२-२०१०** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. विठ्ठल बाबुराव एडके, मु. पो. दावरवाडी, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी, तहसीलदार, तहसील कार्यालय, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. उप विभागीय अधिकारी (महसूल), औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| प्रा. मोरे सरस्वती गणपतराव, | : | अपीलकर्ता |
| विद्यापीठ गेटजवळ,जयसिंगपुरा, घर नं. १-१०-२२, औरंगाबाद | | |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| जन माहिती अधिकारी, | : | उत्तरवादी |
| ग्रंथालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद | | |
| जन अपिलीय अधिकारी तथा | : | |
| ग्रंथपाल, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद | | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१७९९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - प्रा. मोरे सरस्वती गणपतराव | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा सहायक ग्रंथपाल, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद - डॉ. शाईस्ता परवीन | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा उप ग्रंथपाल, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद - डॉ. डी. के. वीर | : | उपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष - डॉ. स्नेहलता मोहोळ | : | उपस्थित |
| ३.५ | डॉ. पी. बी. सोमवंशी, उप कुलसचिव (आस्थापना विभाग), डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद | : | उपस्थित |

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. १४-०८-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | निरंक |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २३-०९-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | निरंक |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १९-११-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी, त्रयस्थ पक्ष व डॉ. पी. बी. सोमवंशी, उप कुलसचिव (आस्थापना विभाग) हे उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी सर्व संबंधितांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन अपिलीय अधिकारी यांनी असा खुलासा केला की, अपिलार्थी यांनी दिनांक १४-०८-२००९ रोजी केलेल्या माहितीच्या अर्जामधील सर्व मुद्दे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित नव्हते म्हणून त्यांनी सदरचा अर्ज रजिस्ट्रार यांच्याकडे पाठविला. त्याची प्रत त्यांनी अपिलार्थीस दिली नाही जी अपिलार्थीस देणे आवश्यक होते.

कुलसचिव यांच्यातर्फे डॉ. पी. बी. सोमवंशी, उप कुलसचिव (आस्थापना विभाग) या उपस्थित आहेत. रजिस्ट्रार यांच्या कार्यालयातर्फे दिनांक १६-०९-२००९ रोजी अर्जदारास कळविण्यात आले की, माहिती विस्तृत स्वरुपाची आहे त्यासाठी एक आठवडा कालावधी लागेल. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने ही बाब मान्य केली. यानंतर दिनांक ०१-१०-२००९ रोजी कळविण्यात आले की, रुपये ३६ इतके शुल्क भरुन आपली माहिती घेऊन जावी, माहिती तयार आहे. अपिलार्थीने व्यक्तिशः माहिती मागितली होती.

अपिलार्थीने सांगितले की, त्यांनी रुपये ३६ चा भरणा केला होता. परंतु त्यांना माहिती उशिरा मिळाली. त्यांनी दिनांक २१-१०-२००९ रोजी शुल्क भरले. अपिलार्थीने सुनावणीच्या वेळी सांगितले की, शुल्क भरल्यानंतर सुध्दा रजिस्ट्रार यांच्या कार्यालयात कित्येदा जाऊन आले पण माहिती उशिरा मिळाली. उप कुलसचिव यांनी सांगितले की, अपिलार्थीस दिनांक ०४-१२-२००९ रोजी माहिती दिली. अपिलार्थीने सांगितले की, माहिती मिळणेबाबत आता तक्रार नाही तथापि त्यांना अयोग्य माहिती मिळाली आहे. त्याकरिता कुलसचिव यांनी अपिलार्थीने मागविलेली माहिती व त्यांना देण्यात आलेली माहिती व्यक्तिशः याचा तौलनिक अभ्यास करुन त्याची सत्यता पडताळणी करावी व अपिलार्थीस तसे कळवावे. आज रोजी अपिलार्थीस माहितीचा एक संच आयोगासमक्ष पुरविण्यात आला तो अपिलार्थीने स्विकारला.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

कुलसचिव यांनी अपिलार्थीने मागविलेली माहिती व त्यांना देण्यात आलेली माहिती यांचा तौलनिक अभ्यास करुन त्याची सत्यता पडताळणी करावी व अपिलार्थीस व्यक्तिशः तसे एका महिन्यात कळवावे. या बरहुकूम आदेश निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-१२-२०१०** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. प्रा. मोरे सरस्वती गणपतराव, विद्यापीठ गेटजवळ,जयसिंगपुरा, घर नं. १-१०-२२, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक ग्रंथपाल, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप ग्रंथपाल, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. कुलसचिव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,<br>बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या<br>पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सय्यद विकारोद्दीन, : अपीलकर्ता

व्दारा राणा ॲटो पार्टस, उद्यान रोड, बस स्टॅण्ड जवळ,<br>पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी

तहसीलदार, तहसील कार्यालय, पैठण, तालुका पैठण,<br>जिल्हा औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :

उप विभागीय अधिकारी, औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/८८३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. सय्यद विकारोद्दीन | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १२-०१-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | निरंक |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८-०२-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २६-०२-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २९-०४-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

अपिलार्थीने दिनांक १२-०१-२००९ रोजी तहसीलदार, पैठण तथा जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीकरिता अर्ज केला होता. कागदपत्रावरुन आयोगास असे आढळून आले आहे की, उप विभागीय अधिकारी, औरंगाबाद तथा प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २६-०२-२००९ रोजी अपिलाची सुनावणी घेऊन अपिलार्थी यांनी मागितलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस सात दिवसाच्या आत देण्यात यावी व माहिती देण्यास विलंब झाल्यास सर्वस्वी जबाबदारी तहसीलदार, पैठण यांची राहील असा निर्णय दिला आहे.

आज रोजी अपिलार्थीने सांगितले की, त्यांना आजपर्यंत माहिती प्राप्त झालेली नाही. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, पैठण उपस्थित नव्हते. या प्रकरणात माहिती देण्याकरिता सुमारे दोन वर्षाचा कालावधी लागला आहे याची गंभीर दखल आयोग घेत आहे. माहिती का देण्यात आली नाही याची कारणमीमांसा होणे आवश्यक आहे याकरिता या अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्या वेळी तत्कालीन जन माहिती अधिकारी, सध्याचे जन माहिती अधिकारी व तहसीलदार, पैठण यांनी स्वतः उपस्थित होणे आयोगास आवश्यक वाटते.

**अंतरीम आदेश**

अपिलाची पुढील सुनावणी दिनांक ०६-०१-२०११ रोजी सकाळी ११-०० वाजता ठेवण्यात येत आहे. या सुनावणीस सर्व माहितीनिशी व पुराव्यानिशी वर नमूद केल्याप्रमाणे तत्कालीन जन माहिती अधिकारी, सध्याचे जन माहिती अधिकारी व तहसीलदार पैठण यांनी स्वतः व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-१२-२०१०** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सय्यद विकारोद्दीन, व्दारा राणा ॲटो पार्टस, उद्यान रोड, बस स्टॅण्ड जवळ, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, पैठण, तालुका पैठण,

जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी (महसूल), औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. जाफर हुसेन कमाल पिता गुलाम हुसेन, : अपीलकर्ता
घर नं. १-१४-९६, देवडी बाजार, औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मुख्य कार्यकारी अधिकारी, वक्फ मंडळ, पानचक्की,
औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ,
पानचक्की, औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००८/रामाआ/अपील/सिआर/२३३८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. जाफर हुसेन कमाल पिता गुलाम हुसेन | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०३-०४-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०२-०७-२००८ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०२-०६-२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २०-०६-२००८ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५-०७-२००८ फेरसादर दिनांक ३०-११-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी आयोगास असे सांगितले की, त्यांनी मागितलेली माहिती उर्दूमध्ये दिलेली आहे ती प्रमाणित साक्षांकीत करुन द्यावी. तसेच त्याची इंग्रजी प्रत करुन त्याची प्रमाणित साक्षांकीत प्रत अपिलार्थीस देण्यात यावी. अपिलार्थीने पुढे असेही सांगितले की, दिलेली माहिती चुकीची देण्यात आलेली आहे. तेव्हा या बाबतची खातरजमा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद यांनी व्यक्तिशः करावी व अचूक माहिती अपिलार्थीस पुरविण्याचे आदेश जन माहिती अधिका-यास द्यावेत व त्याचा पाठपुरावा करावा आणि चुकीची माहिती दिली असल्याचे आढळून आल्यास संबंधिताविरुध्द आवश्यक ती कार्यवाही करावी.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

वर नमूद केल्याप्रमाणे मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद यांनी या प्रकरणात व्यक्तिशः लक्ष घालून कार्यवाही करावी व अंतिम अहवाल सादर करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-१२-२०१०** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. जाफर हुसेन कमाल पिता गुलाम हुसेन, घर नं. १-१४-९६, देवडी बाजार, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, वक्फ मंडळ, पानचक्की, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पानचक्की, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. कल्याण सोपानराव सोनवणे, : अपीलकर्ता
रा. एन-११, के ४०/४, नवजीवन कॉलनी, हडको, औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
संत एकनाथ अध्यापक विद्यालय (डी. एड), मराठी माध्यम,
एन-११, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
श्रीकृष्ण शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, संत एकनाथ
अध्यापक विद्यालय, हडको, औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००८/रामाआ/अपील/सिआर/२३३७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - प्रतिनिधी - ॲड एस. एल. बीडकर | : | अनुपस्थित, उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - प्रतिनिधी - ॲड एस. एल. बीडकर | : | अनुपस्थित, उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १९-०४-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | निरंक |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २६-०५-२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | निरंक |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७-०७-२००८ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे सर्व अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी संत एकनाथ अध्यापक विद्यालय (डी. एड), मराठी माध्यम, एन-११, औरंगाबाद व श्रीकृष्ण शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, संत एकनाथ अध्यापक विद्यालय, हडको, औरंगाबाद तर्फे ॲडव्होकेट श्री. एस. एल. बीडकर उपस्थित आहेत. त्यांनी बाजू मांडली.

ॲडव्होकेट श्री. एस. एल. बीडकर यांनी त्यांची बाजू आयोगापुढे सादर करताना सांगितले की, संत एकनाथ अध्यापक विद्यालय (डी. एड), मराठी माध्यम, एन-११, औरंगाबाद हे श्रीकृष्ण शिक्षण प्रसारक मंडळ या सार्वजनिक न्यासा अंतर्गत आहे. त्यांना माहिती अधिकार अधिनियम लागू होत नाही. याबाबत त्यांनी मा. उच्च न्यायालयाचा निर्णय त्याचप्रमाणे मुख्य राज्य माहिती आयुक्त, मुंबई यांचा निर्णयाबाबत उहापोह केला. माहिती अधिकार अधिनियमामधील तरतुदी-नुसार या ट्रस्टला जर शासनाकडून अनुदान उपलब्ध होत असेल तर माहिती अधिकार अधिनियमा-मध्ये त्याचा अंर्तभाव होऊ शकतो. ॲडव्होकेट यांनी सांगितले की, अशा प्रकारची कोणतीही मदत त्यांच्या संस्थेला प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष शासनाने दिलेली नाही. त्यामुळे माहिती अधिकार अधिनियम त्यांना लागू होत नाही. माहिती अधिकार अधिनियम लागू होत नसल्यामुळे या ट्रस्टमध्ये किंवा अध्यापक विद्यालयामध्ये जन माहिती अधिकारी किंवा जन अपिलीय अधिकारी यांच्या नियुक्त्या करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही.

आज सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहे. त्यामुळे त्यांची बाजू आयोगास अवगत झाली नाही. ॲडव्होकेट यांनी जो युक्तिवाद केला त्याबाबत त्यांनी लेखी शपथपत्रासह आपले म्हणणे सादर केले आहे. या सर्व बाबींवर साकल्याने विचार करुन या संस्थेला माहिती अधिकार अधिनियम लागू होत नाही या निर्णयाप्रत आयोग आला आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील फेटाळण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-१२-२०१०** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. कल्याण सोपानराव सोनवणे, रा. एन-११, के ४०/४, नवजीवन कॉलनी, हडको, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा संत एकनाथ अध्यापक विद्यालय (डी. एड), मराठी माध्यम, एन-११, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा श्रीकृष्ण शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, संत एकनाथ अध्यापक विद्यालय, हडको, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| ॲड एस. पी. बोरा,<br>प्लॉट नं. एन बी-बी-६, न्यू बालाजी नगर, जालना रोड, औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड, पानचक्की, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड, औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००८/रामाआ/अपील/सिआर/२३३६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०७-०३-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | निरंक |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १५-०४-२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | निरंक |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०१-०७-२००८<br>फेरसादर दिनांक<br>१२-११-२००८ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी उपस्थित नाहीत.

उपलब्ध कागदपत्रावरुन असे आढळून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पुरविलेली नाही तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेतलेली आहे किंवा कसे याचाही बोध होत नाही याची गंभीर दखल आयोग घेत आहे. प्रथमदर्शनी जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियमास योग्य आदराने हाताळले नाही असे दिसत आहे. या सर्व बाबींचा विचार करता अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय देणे आवश्यक आहे तरी आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या दिनांक १५-०४-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारीत करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-१२-२०१०** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. ॲड एस. पी. बोरा, प्लॉट नं. एन बी-बी-६, न्यू बालाजी नगर, जालना रोड, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड, पानचक्की, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. रामकुमार पांडुरंग सोनवणे, : अपीलकर्ता
कोकणवाडी, आदर्श महिला नागरी बँकेच्या शेजारी,
औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मुख्य अभियंता, सिंचन भवन, जालना रोड, औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
सहायक मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१८०९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. रामकुमार पांडुरंग सोनवणे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, कार्यालय मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, औरंगाबाद - श्री. मधुकर माधवराव बिनोरकर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा सहायक मुख्य अभियंता, (जसं) जलसंपदा विभाग, औरंगाबाद - श्री. प्र. वि. मान्नीकर | : | उपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष - श्री. ओ. एस. उघडे, सहायक भांडारपाल | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २४-०९-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०५-१०-२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०६-११-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०८-१२-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७-१२-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष हे सर्वजण उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे सांगितले की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २४-०९-२००९ रोजीच्या अर्जान्वये त्रयस्थ पक्षाची तीन मुद्दयांवर माहिती मागितली होती. तथापि मुद्दा क्रमांक १ व २ ची माहिती त्यांना देता येत नाही असे अपिलार्थीस दिनांक ०५-१०-२००९ रोजी कळविले आहे. तसेच मुद्दा क्रमांक ३ ची माहिती त्याच पत्राने कळविण्यात आली आहे. जन अपिलीय अधिका-याने प्रथम अपिलावर दिनांक ०८-१२-२००९ रोजी सुनावणी घेऊन निर्णय दिला आहे. या निर्णयामध्ये सुध्दा जन माहिती अधिका-याच्या कृतीचे समर्थन केले आहे. त्रयस्थ पक्षाची मालमत्तेची माहिती उपलब्ध करुन दिल्याने कोणतेही लोकहित साध्य होईल असे वाटत नाही असे मत प्रतिपादिले आहे व अपिलार्थीचे अपील नामंजूर करण्यात आले आहे.

प्रसंगावशात आज रोजी अपिलार्थीचा दिनांक १९-०७-२०१० रोजीचा अर्ज आयोगासमोर आहे. या अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांची या प्रकरणी काही तक्रार राहिली नाही व विचाराधीन अपील निकाली काढावे अशी आयोगास विनंती केली आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-१२-२०१०** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रामकुमार पांडुरंग सोनवणे, कोकणवाडी, आदर्श महिला नागरी बँकेच्या शेजारी, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, कार्यालय मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक मुख्य अभियंता, (जसं) जलसंपदा विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. दत्ता पाटील काकडे,<br>रा. टाकळी कोलते, तालुका फुलंब्री, जिल्हा औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, फुलंब्री, तालुका फुलंब्री, जिल्हा औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, फुलंब्री, तालुका फुलंब्री, जिल्हा औरंगाबाद | : | |
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१८०८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (म.२), तहसील कार्यालय, फुलंब्री, तालुका फुलंब्री, जिल्हा औरंगाबाद - श्री. मशहुद अलीखान | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, फुलंब्री, तालुका फुलंब्री, जिल्हा औरंगाबाद - कु. रुपाली चौगुले | : | उपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष - श्री. सखाराम त्र्यंबक साळूंके | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०१-०१-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | निरंक |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ११-०२-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | निरंक |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०२-०४-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. अपिलार्थी आज रोजी सुनावणीस उपस्थित नसल्यामुळे त्यांचे म्हणणे आयोगास अवगत झाले नाही.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर असे सांगितले की, अपिलार्थीस दिनांक २७-०५-२००९ रोजीच्या पत्राव्दारे कळविले होते की, माहिती उपलब्ध आहे. तसेच त्यांनी पुढे असे सांगितले की, अपिलार्थीस माहिती पुरविण्यात आली असून अपिलार्थीस दिनांक ०१-१२-२०१० रोजी माहिती मिळाली अशी त्यांनी पोच दिली आहे. आज रोजी सुनावणीस अपिलार्थी उपस्थित नाहीत त्यामुळे त्यांची बाजू ऐकून घेता आली नाही. तथापि जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास वरील बाबी अवगत केल्यावरुन अपील निकाली काढण्यात यावे असे आयोगाचे मत झाले आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०३-१२-२०१०**

--------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. दत्ता पाटील काकडे, रा. टाकळी कोलते, तालुका फुलंब्री, जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (म.२), तहसील कार्यालय, फुलंब्री, तालुका फुलंब्री, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, फुलंब्री, तालुका फुलंब्री, जिल्हा औरंगाबाद

यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. मोहम्मद अब्दुल अजीज इंजिनिअर, : अपीलकर्ता
घर नं. १-१५-५०, नेहरु भवन जवळ, बुढ्ढीलेन, औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१८०३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. मोहमद अब्दुल अजीज इंजिनिअर | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, परभणी - श्री. बाबाराव भागुजी सोनवणे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, परभणी - श्री. गजानन शंकर खाडे | : | उपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष - श्री. व्ही. जी. पाटील, उप अभियंता | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १५-०८-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | निरंक |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २७-१०-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | निरंक |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १४-१२-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

आयोगासमोर आलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक १५-०८-२००९ रोजीच्या अर्जान्वये पाच मुद्दयांवर काही माहिती मागितली होती. ही माहिती अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी अपिलार्थीस देऊ शकले नाहीत. प्रथम अपिलीय अधिका-याने अपिलावर निर्णय देतांना सदरची माहिती देय आहे व अपिलार्थीस त्वरीत द्यावी व झालेला विलंब हा दंडनीय आहे असा निर्णय दिला आहे. तरीही जन माहिती अधिका-याने माहिती दिली नाही ही बाब गंभीर आहे. अपिलार्थीने मागितलेली माहिती आणि त्यांनी आज केलेल्या खुलाशाप्रमाणे संबंधित माहिती सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिका-यांशी संबंधित आहे. यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाशी संबंधित अधिका-यांची नावे जिथे आहेत अशीच Stock Ledger च्या पानाच्या सत्यप्रती अपिलार्थीने मागितल्या आहेत व अपिलार्थीच्या म्हणण्यानुसार या प्रती त्यांना देण्यात याव्यात. तसेच मुद्दा क्रमांक ४ व ५ शी संबंधित माहिती एका अधिका-याशी संबंधित आहे त्यामुळे त्याच्या प्रमाणित साक्षांकीत प्रती त्यांना द्याव्या लागतील.

सुनावणीच्या वेळी त्रयस्थ पक्षानेही त्यांची माहिती देण्यास त्यांची काही हरकत नाही असे आयोगासमोर सांगितले.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागितलेल्या मुद्दा क्रमांक १ ते ५ च्या वरीलप्रमाणे माहितीच्या प्रमाणित साक्षांकीत प्रती अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाव्दारे पुरवाव्यात.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-१२-२०१०** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मोहमद अब्दुल अजीज इंजिनिअर, घर नं. १-१५-५०, नेहरु भवन जवळ, बुढ्‌ढीलेन, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सईद बाबुभाई शाह, : अपीलकर्ता

व्दारा - ॲड एन. बी. शाह यांचे कार्यालय, घर नं. २-१-१३,
साने हॉस्पिटल जवळ, ज्युबिली पार्क, औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी

महाराष्ट्र परिचर्या परिषद, राज्य कामगार विमा योजना
रुग्णालय आवार, परिचारीका वस्तीगृह २ रा मजला, एल.
बी. एस. मार्ग, मुलूंड (पश्चिम), मुंबई - ४०० ०८०

जन अपिलीय अधिकारी, :

महाराष्ट्र परिचर्या परिषद, राज्य कामगार विमा योजना
रुग्णालय आवार, परिचारीका वस्तीगृह २ रा मजला, एल.
बी. एस. मार्ग, मुलूंड (पश्चिम), मुंबई - ४०० ०८०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१६७० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०७-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - प्रतिनिधी - ॲडव्होकेट श्री. एन. बी. शाह | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष - सार्वजनिक सुश्रूषा विद्यालय, नागपूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १०-०८-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २०-०८-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७-०९-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १५-०९-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११-११-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे ॲडव्होकेट श्री. एन. बी. शाह उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित नाहीत. त्यांनी परिचारिकांच्या परीक्षा चालू असल्यामुळे व ते परीक्षेच्या कामात गुंतलेले असल्यामुळे आयोगाकडील सुनावणीस उपस्थित राहता येत नाही असे आयोगास त्यांच्या दिनांक ०३-१२-२०१० रोजीच्या पत्राने कळविले आहे.

उपलब्ध कागदपत्रावरुन असे दृष्टोत्पत्तीस येते की, जन माहिती अधिकारी तथा प्रबंधक यांनी त्यांच्या दिनांक २०-०८-२००९ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस माहिती पाठविली आहे. त्याचप्रमाणे प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक १५-०९-२००९ रोजीच्या प्रथम अपिलावर दिनांक १५-०९-२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील फेटाळले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी ॲडव्होकेट श्री. एन. बी. शाह यांनी त्यांची बाजू मांडली. त्यांनी आयोगास अवगत केले की, त्यांना माहिती प्राप्त झाली तथापि त्यांनी मागितलेल्या माहितीपैकी खालील बाबी त्यांना प्राप्त झाल्या नाहीत.

१. मुद्दा क्रमांक १ बाबत सन २००९ मध्ये सार्वजनिक आरोग्य परिचर्या परीक्षेसाठी सार्वजनिक शुश्रूषा परिचारिका संस्था, नागपूर यांच्याकडून २९ प्रशिक्षणार्थी हजर होते ही बाब त्यांना प्राप्त झाली तथापि २९ प्रशिक्षणार्थींची नावे त्यांनी मागितली होती ती त्यांना प्राप्त झालेली नाहीत ती जन माहिती अधिकारी यांनी द्यावी.

२. मुद्दा क्रमांक २ व ५ बाबत माहिती देता येत नाही या प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाशी आयोग सहमत आहे.

३. मुद्दा क्रमांक ३ बाबत ॲडव्होकेट श्री. एन. बी. शाह यांनी युक्तिवाद केला की, प्रशिक्षण संस्थेतील प्रशिक्षणार्थीना देण्यात येणारे मूल्यमापन गुण परीक्षा पूर्ण झाल्यानंतर प्रत्येक विद्यार्थ्याला देण्यात येतात व ते संकेतस्थळावर देखील प्रसिध्द करण्यात येतात. त्यामुळे त्यांना ही माहिती मिळाली पाहिजे त्यांच्या या युक्तिवादाशी आयोग सहमत आहे. जन माहिती अधिका-याने ज्या पध्दतीने या मार्कशीट विद्यार्थ्यांना देण्यात येतात त्याच प्रमाणे ही माहिती देखील अपिलार्थीस द्यावी.

४. मुद्दा क्रमांक ४ बाबत ॲडव्होकेट श्री. एन. बी. शाह यांनी युक्तिवाद केला की, सदर परीक्षेचे पेपर पुन्हा तपासण्याची तरतूद आहे किंवा कसे याबाबतची माहिती मागितली होती ती सुस्पष्ट नाही यापुरती मर्यादीत ही माहिती देण्यास हरकत नाही. जन माहिती अधिका-याने अपिलार्थीस यासंदर्भात काही आदेश, परिपत्रक इत्यादी असल्यास त्याची झेरॉक्स प्रत विनामूल्य पुरवावी.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी वर ऊहापोह केल्याप्रमाणे अपिलार्थीने मागितलेल्या माहितीपैकी उर्वरीत देय असलेली माहिती त्यांना हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पुरवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०७-१२-२०१०** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सईद बाबुभाई शाह, व्दारा - ॲड एन. बी. शाह यांचे कार्यालय, घर नं. २-१-१३, साने हॉस्पिटल जवळ, ज्युबिली पार्क, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी, महाराष्ट्र परिचर्या परिषद, राज्य कामगार विमा योजना रुग्णालय आवार, परिचारीका वस्तीगृह २ रा मजला, एल. बी. एस. मार्ग, मुलूंड (पश्चिम), मुंबई - ४०० ०८० यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी, महाराष्ट्र परिचर्या परिषद, राज्य कामगार विमा योजना रुग्णालय आवार, परिचारीका वस्तीगृह २ रा मजला, एल. बी. एस. मार्ग, मुलूंड (पश्चिम), मुंबई - ४०० ०८० यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. गुलाम फैय्याज सिद्दीकी,<br>घर नं. २-११-४५ पंचकुवॉ, किले अर्क, औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१६७१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०७-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. गुलाम फैय्याज सिद्दीकी | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद - प्रतिनिधी - शिक्षण विस्तार अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद - श्री. सकदेव ए. एम. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद - श्री. पी. बी. चव्हाण | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १६-०६-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १०-०७-२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १८-०७-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | निरंक |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४-१२-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या दिनांक १६-०६-२००९ रोजीच्या अर्जाव्दारे एकंदर ७ मुद्दयांवर सन २००० ते २००९ या कालावधीशी संबंधित काही माहिती मागितली होती.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने सांगितले की, त्यांनी काही मुद्दयांवर अपिलार्थीस माहिती दिली आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीचे हे म्हणणे कबूल केले. तथापि त्यांनी २००० ते २००९ या कालावधीतील मागितलेल्या माहितीपैकी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात जेवढी माहिती उपलब्ध होती त्याच्या झेरॉक्स दिल्या.

प्रथम अपिलीय अधिका-याने अपिलार्थीच्या दिनांक १८-०७-२००९ रोजीच्या प्रथम अपिलावर दिनांक ०९-१०-२००९ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत माहिती द्यावी असे निर्देश दिले होते. त्याबरहुकूम अपिलार्थीस दिनांक २६-१०-२००९ रोजी कार्यालयात उपस्थित राहून माहिती घेऊन जावी असे कळविले होते त्या दिवशी अपिलार्थी कार्यालयात उपस्थित राहिले होते परंतु त्यांना संपूर्ण माहिती मिळाली नाही तरी या सर्व बाबींचे पुन्हा एकदा पुर्नविलोकन करुन अपिलार्थीने मागितलेल्या माहितीपैकी जेवढी माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध आहे ती सर्व माहिती नोंदणीकृत टपालाने अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी तसेच जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत अपिलार्थीस तसे कळविण्यात यावे, असे जन माहिती अधिकारी यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील पार्श्वभूमीवर आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

१. जन माहिती अधिकारी यांनी वर निर्णयामध्ये नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने मागितलेल्या माहितीपैकी जेवढी माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध आहे ती सर्व माहिती अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पुरवावी. तसेच जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत अपिलार्थीस तसे कळविण्यात यावे.

२. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीपैकी जी माहिती कार्यालयात उपलब्ध नसेल त्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी स्वत: चौकशी नेमून कागदपत्रे उपलब्ध का नाहीत याबाबत चौकशी करुन संबंधितांविरुध्द दोषी आढळल्यास कारवाई करावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०७-१२-२०१०**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. गुलाम फैय्याज सिद्दीकी, घर नं. २-११-४५ पंचकुवॉ, किले अर्क, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. अरुण रघुनाथ गायके,<br>मु. पो. रेल, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>तालुका कृषि कार्यालय, नरसिंगपूर,<br>तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>कृषि अधिकारी, कृषि अधिकारी कार्यालय, कन्नड, जिल्हा औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१६७२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०७-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. अरुण रघुनाथ गायके | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, कन्नड, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद - श्री. अशोक साहेबराव कोडे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, कन्नड, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद - श्री. विश्वासराव कृष्णा पालीमकर | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११-०८-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | निरंक |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०३-१०-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | निरंक |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०१-१२-२००९

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, अपिलार्थीस त्यांनी दिनांक २५-०६-२०१० रोजी संपूर्ण एकूण ९६ पृष्ठांची माहिती दिलेली आहे. तथापि अपिलार्थीने सांगितले की, त्यांना ही माहिती मिळालेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीची पोच दाखविली असता याबाबत पोचवरील सही ही त्यांची नाही असे अपिलार्थीचे म्हणणे आहे. आज रोजी आयोगाने जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ९६ पृष्ठांच्या छायांकीत प्रती विनामूल्य द्याव्यात असे सांगितले. जन माहिती अधिकारी यांनी सदर माहिती अपिलार्थीस आयोगासमोर दिली.

अपिलार्थीने दिनांक ११-०८-२००९ रोजी माहितीसाठीचा अर्ज व दिनांक ०३-१०-२००९ रोजी प्रथम अपील केले आहे आणि त्यांना उशीरा माहिती मिळाली आहे. अपिलार्थीस माहिती मिळण्यासाठी बराच विलंब झालेला आहे. हा विलंब कोणाच्या स्तरावर झाला याची चौकशी होणे आयोगास आवश्यक वाटते. सह संचालक (कृषि), औरंगाबाद यांनी स्वतंत्रपणे या विलंबाबाबत चौकशी करावी व संबंधित अधिकारी, कर्मचारी जे दोषी आढळतील त्यांच्याविरुध्द शिस्तभंग-विषयक कारवाई करावी, अशी त्यांना शिफारस करण्यात येत आहे.

वरील पार्श्वभूमीवर आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

सह संचालक (कृषि), औरंगाबाद यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी या प्रकरणी झालेल्या विलंबाबाबत चौकशी करावी व संबंधित अधिकारी, कर्मचारी जे दोषी आढळतील त्यांच्याविरुध्द शिस्तभंगविषयक कारवाई करावी, अशी त्यांना शिफारस करण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०७-१२-२०१०** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अरुण रघुनाथ गायके, मु. पो. रेल, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, कन्नड, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, कन्नड, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सह संचालक (कृषि), औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. यादव परशराम राठोड, | : | अपीलकर्ता |
| रा. आंबा तांडा, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद | | |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी, | : | उत्तरवादी |
| विशेष समाजकल्याण अधिकारी कार्यालय, औरंगाबाद | | |
| जन अपिलीय अधिकारी तथा | : | |
| विशेष समाजकल्याण अधिकारी, औरंगाबाद | | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१६७३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०७-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. यादव परशराम राठोड | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, नवजीवन प्राथमिक / माध्यमिक आश्रमशाळा, आंबा तांडा, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद - श्री. गणेश देवचंद राठोड | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, औरंगाबाद - श्री. प्रकाश बच्छाव | : | उपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष - मुख्याध्यापक, नवजीवन प्राथमिक / माध्यमिक आश्रमशाळा, आंबा तांडा, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद - श्री. गणेश देवचंद राठोड | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०५-१०-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | निरंक |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १९-११-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | निरंक |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३-१२-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा त्रयस्थ पक्ष व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, अपिलार्थीस त्यांनी दिनांक १५-०३-२०१० रोजी माहिती दिलेली आहे. अपिलार्थीने दिनांक १५-०३-२०१० रोजी माहिती मिळाली आहे असे सांगितले.

प्रसंगावशात प्रथम अपिलीय अधिका-याने अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर दिनांक १४-१२-२००९ रोजी सुनावणी घेऊन १५ दिवसाच्या आत विनामूल्य व परिपूर्ण माहिती द्यावी असे आदेश दिले होते. अपिलार्थीस उशीरा माहिती मिळाली आहे याबाबत त्यांचे काही म्हणणे नाही. तथापि त्यांच्या पुढील अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी वेळेत कार्यवाही करावी अशी त्यांची अपेक्षा असल्याचे त्यांनी आयोगास सांगितले.

वरील पार्श्वभूमीवर आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०७-१२-२०१०** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. यादव परशराम राठोड, रा. आंबा तांडा, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, नवजीवन प्राथमिक / माध्यमिक आश्रमशाळा, आंबा तांडा, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील

नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. एस. एन. काद्री, : अपीलकर्ता
रऊफ कॉलनी, नेहरु भवनजवळ, औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ,
औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ,
औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१६७४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०७-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. एस. एन. काद्री | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा सहायक अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद - श्री. एस. एम. मांगुळकर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष - श्री. सय्यद किफायतुल्ला मो. ई. शाखा अभियंता, श्री. आबेद अली, कनिष्ठ अभियंता | : | उपस्थित, उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०२-०७-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | निरंक |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २०-०७-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | निरंक |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ११-११-२००९

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व त्रयस्थ पक्ष उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, त्यांनी अपिलार्थीस प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या दिवशी दिनांक २४-०८-२००९ रोजी माहिती दिली. तसेच यापूर्वी दिनांक ०८-०७-२००९ रोजी काही माहिती दिली होती. अपिलार्थीने ही माहिती मिळाल्याचे मान्य केले आहे.

वरील सर्व बाबींचा विचार करुन आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०७-१२-२०१०** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. एस. एन. काद्री, रऊफ कॉलनी, नेहरु भवनजवळ, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. मिर अमजद अली ईकबाल अली, : अपीलकर्ता
प्लॉट नं. २६, एन-१३/ए, हिमायतबाग, औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मुख्याध्यापिका, अन्निसा ऊर्दू माध्यमिक शाळा, रविंद्रनगर, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
सचिव, ऑल सिस्टर्ड एज्युकेशन सोसायटी, रविंद्रनगर, औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१६७५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०७-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष - श्री. शेख सईद शेख रफिक | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १६-०४-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २७-०७-२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २३-०७-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | निरंक |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०-१२-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहेत.

आयोगापुढे पुरेशी कागदपत्रे उपलब्ध नाहीत. त्यामुळे आयोगास निर्णय घेणे शक्य होत नाही. या प्रकरणी अपिलार्थीने त्यांचे प्रथम अपील सचिव, ऑल सिस्टर्ड एज्युकेशन सोसायटी, औरंगाबाद यांचेकडे केले होते. प्रथम अपिलीय अधिका-याने यावर सुनावणी घेतलेली आढळून येत नाही. प्रथम अपिलीय अधिका-याने या प्रकरणात प्रथम सुनावणी घेऊन प्रकरण निकाली काढणे आवश्यक आहे असे आयोगास वाटते. शिक्षण संचालनालयाने त्यांचे आदेश क्रमांक संकीर्ण/केंमाअ/ २००७/६३५२७/१५ क्र.(८)६०३७, दिनांक २६-११-२००७ च्या पत्रकाव्दारे प्रत्येक जिल्ह्याच्या जिल्हा परिषदेमधील शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांना शिक्षण संस्थांच्या संदर्भात जन अपिलीय अधिकारी म्हणून नियुक्त केलेले आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता, या प्रकरणी संबंधित माध्यमिक शाळेस त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देण्याकरिता, आयोगास या टप्प्यावर जिल्हा परिषदेचे शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी अपिलार्थीच्या दिनांक २३-०७-२००९ रोजीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेणे गरजेचे वाटते.

वरील सर्व बाबींचा विचार करुन आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

प्रथम अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या दिनांक २३-०७-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारीत करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०७-१२-२०१०** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मिर अमजद अली ईकबाल अली, प्लॉट नं. २६, एन-१३/ए, हिमायतबाग, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, अन्निसा ऊर्दू माध्यमिक शाळा, रविंद्रनगर, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद

यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (सोबत : दिनांक १६-०४-२००९ रोजीच्या मूळ अर्जाची व दिनांक २३-०७-२००९ रोजीच्या प्रथम अपिलाची प्रत).

४. सचिव, ऑल सिस्टर्ड एज्युकेशन सोसायटी, रविंद्रनगर, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सुधाकर मोतीराम करोडे, : अपीलकर्ता
३२, राजीव गांधी नगर, महालक्ष्मी चौकाजवळ, मुकूंदवाडी,
औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१८१३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०७-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद - प्रतिनिधी - श्री. आर. व्ही. निकम, कार्यालय अधीक्षक | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १०-०९-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १५-१०-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९-१०-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | निरंक |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०२-१२-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित नाहीत ते कलावंत आहेत असे आयोगास सांगण्यात आले.

आयोगासमोर उपलब्ध कागदपत्रावरुन अपिलार्थी यांना माहिती मिळाली नाही असे दिसून येते. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित नाहीत. प्रकरणात दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटते. प्रकरणात सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश**

सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणी दिनांक ०६-०१-२०११ रोजी सकाळी ११-०० वाजता ठेवण्यात येत आहे. पुढील सुनावणीस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणाची सविस्तर माहिती तसेच अपिलार्थीस द्यावयाच्या माहितीच्या झेरॉक्स प्रती दोन प्रतीत सोबत आणावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०७-१२-२०१०** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सुधाकर मोतीराम करोडे, ३२, राजीव गांधी नगर, महालक्ष्मी चौकाजवळ, मुकूंदवाडी, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. अंकुश एम. पवार, | : | अपीलकर्ता |
| प्लॉट नं. एफ-४१/१२, एन-७, सिडको, अयोध्यानगर, औरंगाबाद | | |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| जन माहिती अधिकारी तथा | : | उत्तरवादी |
| तालुका कृषि अधिकारी, कार्यालय, बदनापूर, जिल्हा जालना | | |
| जन अपिलीय अधिकारी तथा | : | |
| उपविभागीय कृषि अधिकारी, कार्यालय, जालना | | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००७/रामाआ/अपील/सिआर/२९१६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०७-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. २६-०३-२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १०-०४-२००७ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. २६-०४-२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ०१-०६-२००७ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २४-०७-२००७ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित आहेत त्यामुळे या प्रकरणात त्यांची बाजू आयोगास अवगत झाली नाही.

आयोगापुढील कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीले जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, कार्यालय, बदनापूर, जिल्हा जालना यांच्याकडून दिनांक २६-०३-२००७ रोजीच्या अर्जाने एकंदर ७० ठिकाणी रोहयो अंतर्गत झालेल्या कामावरील मजुराचे अ. क्र., त्यांचे पूर्ण नांव, त्यांचे मूळ गाव, त्यांचा तालुका, त्यांचा जिल्हा, मजुराची नांवे लिहिलेले हजेरीपट, कामावर पाया तपासणी केलेल्या अधिका-याचा अहवाल, मजुराचे वय, मोजमाप पुस्तिका या सर्व मुद्दयांच्या छायांकत प्रती मागितल्या होत्या. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः मागितली होती.

| जन अपिलीय अधिकारी,<br>पोलीस आयुक्त कार्यालय, नाशिक | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१८३९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०८-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. राजेश सांडुजी हिवराळे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त (प्रशासन), पोलीस आयुक्त कार्यालय, नाशिक - श्री. रमेश गोविंद गायकवाड | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त (मुख्यालय), पोलीस आयुक्त कार्यालय, नाशिक | : | अनुपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष - श्री. एम. जी. राघोर्ते, सहायक आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक | : | उपस्थित |
| ३.५ | त्रयस्थ पक्ष - श्री. पी. एस. सोनवणे, समाजकल्याण निरीक्षक, विशेष जिल्हा समाजकल्याण कार्यालय, नाशिक | : | उपस्थित |
| ३.६ | त्रयस्थ पक्ष श्री. एम. आर. पाईकराव | : | अनुपस्थित |

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०८-०५-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ०६-०६-२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ०९-०६-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | निरंक |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ३०-०९-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, त्रयस्थ पक्ष श्री. एम. जी. राघोर्ते, श्री. पी. एस. सोनवणे उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष श्री. एम. आर. पाईकराव अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे व त्रयस्थ पक्षांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

सहायक पोलीस आयुक्त (प्रशासन) यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने मागितलेली माहिती व चौकशी प्रकरण हे अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांच्या कार्यालयाशी संबंधित आहे. यामुळे अपिलार्थीचा माहितीसाठीचा अर्ज दिनांक ०६-०६-२००९ रोजी संबंधित कार्यालयास कार्यवाही व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी पाठविला व त्याची प्रत अपिलार्थीस दिली. अपिलार्थीस त्याची प्रत प्राप्त झाली आहे, असे अपिलार्थीने सुनावणीच्या वेळी मान्य केले. या प्रकरणासंदर्भात सहायक आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक हे जन माहिती अधिकारी होत आहे. तसेच प्रथम अपिलाचा अर्ज आदिवासी विभागाकडे दिनांक २०-०६-२००९ रोजी पाठविण्यात आला आहे तथापि प्रथम अपिलाची सुनावणी अपर आयुक्त, आदिवासी विकास विभाग, नाशिक यांनी घेतलेली आहे असे आयोगास आढळून आले नाही. असे असल्यास ही बाब गंभीर आहे याची नोंद आयोगास घ्यावी लागेल करिता अपर आयुक्त, आदिवासी विकास विभाग, नाशिक यांनी यापुढे दक्ष रहाणे आवश्यक राहील.

आज रोजी सहायक आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक श्री. एम. जी. राघोर्ते उपस्थित आहेत. त्यांनी आयोगास सुनावणीच्या वेळी सांगितले की, या प्रकरणी त्यांच्या कार्यालयात वरिष्ठांना चौकशीअंती संबंधित अधिकारी / कर्मचारी दोषी आढळून आले नाहीत या निष्कर्षाप्रत कार्यालय आले आहे व चौकशीची प्रक्रीया पूर्ण झाली आहे. त्यामुळे या नस्तीचा (Noting and correspondence side) संपूर्ण झेरॉक्स संच अपिलार्थीस देय होत आहे असे आयोगाचे मत आहे.

त्रयस्थ पक्षांनी माहिती देण्यास त्यांची काहीही हरकत नाही असे आयोगासमोर सांगितले.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा सहायक आयुक्त, आदिवासी विकास, कार्यालय अपर आयुक्त आदिवासी विकास, नाशिक यांनी अपिलार्थीने केलेल्या अर्जावर आणि कार्यालयात या अर्जावर वरिष्ठांनी घेतलेल्या निष्कर्षाची संपूर्ण नोटींग व पत्रव्यवहाराच्या झेरॉक्स प्रती अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवाव्यात.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०८-१२-२०१०**

-------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. राजेश सांडुजी हिवराळे, घर क्रमांक २६१, मिलींदनगर, उस्मानपुरा, औरंगाबाद.
२. जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त (प्रशासन), पोलीस आयुक्त कार्यालय, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
३. श्री. एम. जी. राघोर्ते, सहायक आयुक्त आदिवासी विकास, अपर आयुक्त आदिवासी विकास, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
४. जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त (मुख्यालय), पोलीस आयुक्त कार्यालय, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. अरुण सोनाजीराव घोडके, : अपीलकर्ता
रा. १२३०, साळीवाडा, पैठण, तालुका पैठण,
जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
मुख्याधिकारी, कार्यालय नगर परिषद, पैठण, तालुका पैठण,
जिल्हा औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्याधिकारी, नगर परिषद, पैठण, तालुका पैठण,
जिल्हा औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१८३७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०८-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८-०५-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | निरंक |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०-०७-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २९-०८-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६-०९-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे सर्वजण अनुपस्थित आहेत याची आयोग गंभीर दखल घेत आहे.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिका-याने अपिलार्थीस माहिती दिलेली नाही. अपिलार्थीने चार मुद्दयांवर काही माहिती व्यक्तिशः मागितली होती. प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, पैठण यांनी दिनांक २९-०८-२००९ रोजी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर निर्णय देताना असे निर्देश दिले होते की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्देनिहाय माहिती सात दिवसाच्या आत जन माहिती अधिका-याने विनामूल्य द्यावी. आज रोजी आयोगासमोर जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित नसल्यामुळे त्यांची बाजू आयोगास अवगत झाली नाही. सदर प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणी दिनांक ०६-०१-२०११ रोजी सकाळी ११-०० वाजता ठेवण्यात येत आहे. पुढील सुनावणीस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहणे आवश्यक राहील व जन अपिलीय अधिकारी मुख्याधिकारी, नगर परिषद, पैठण नसतील तर त्यांनी उपस्थित राहणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>अंतरिम आदेश</u>**

अपील प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणी दिनांक ०६-०१-२०११ रोजी सकाळी ११-०० वाजता ठेवण्यात येत आहे. पुढील सुनावणीस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहणे आवश्यक राहील व जन अपिलीय अधिकारी मुख्याधिकारी, नगर परिषद, पैठण नसतील तर त्यांनी उपस्थित राहणे आवश्यक आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक ०८-१२-२०१०**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अरुण सोनाजीराव घोडके, रा. १२३०, साळीवाडा, पैठण, तालुका पैठण, जिल्हा

औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी, कार्यालय नगर परिषद, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. राजू भुजंगराव तारे, : अपीलकर्ता
बाळानगर, पाचोड रोड, अंबड, तालुका अंबड,
जिल्हा जालना

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
तालुका कृषि कार्यालय, घनसावंगी, तालुका घनसावंगी,
जिल्हा जालना

जन अपिलीय अधिकारी, :
तालुका कृषि कार्यालय, घनसावंगी, तालुका घनसावंगी,
जिल्हा जालना

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१६४० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०८-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. राजू भुजंगराव तारे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, घनसावंगी, तालुका घनसावंगी, जिल्हा जालना - श्री. सय्यद वाय. एम. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, घनसावंगी, तालुका घनसावंगी, जिल्हा जालना | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५-०६-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | निरंक |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २०-०७-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | निरंक |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९-११-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने आयोगास सांगितले की, त्यांना अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती मिळालेली नाही.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता, अपिलार्थीने मोठ्या प्रमाणात व्याप्ती असलेल्या माहितीची मागणी केलेली आहे. ही माहिती अपिलार्थीस पुरविण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना यांच्या कार्यालयाची साधनसामग्री प्रमाणाबाहेर वळवावी लागणार आहे. त्यामुळे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात जाऊन सदर माहितीचे निरीक्षण करुन त्यातील त्यांना आवश्यक तेवढ्या माहितीच्या झेरॉक्स प्रती जन माहिती अधिकारी यांच्याकडून घेणे योग्य ठरेल असे आयोगाचे मत आहे व अपिलार्थी यास सहमत आहेत.

जन माहिती अधिकारी यांनीही आयोगापुढे कबुलीजबाब दिला की, अपिलार्थीने मागितलेली सर्व माहिती अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात निरीक्षणासाठी उपलब्ध करुन देण्यात येईल. माहितीची व्याप्ती मोठी असल्यामुळे अपिलार्थीला माहिती निरीक्षणासाठी तीन दिवस देण्यात यावेत.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत तीन दिवस (सकाळी ११-०० ते सायंकाळी ०५-०० वाजेपर्यंत) निश्चित करुन अपिलार्थीने मागितलेली माहिती निरीक्षणासाठी उपलब्ध करुन द्यावी व त्यातील अपिलार्थीस आवश्यक असलेल्या कागदपत्राच्या झेरॉक्स प्रती विनामूल्य द्याव्यात.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०८-१२-२०१०** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. राजू भुजंगराव तारे, संपादक रिपब्लिकन भारत, बाळानगर, पाचोड रोड, अंबड, तालुका अंबड, जिल्हा जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, घनसावंगी, तालुका घनसावंगी, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, घनसावंगी, तालुका घनसावंगी, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. डिगांबर पाटीलबा कुदर, : अपीलकर्ता
मु. बोरगांव जहा. पो. सिपोरा बा. तालुका भोकरदन,
जिल्हा जालना

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
पंचायत समिती, भोकरदन, तालुका भोकरदन, जिल्हा जालना
जन अपिलीय अधिकारी तथा :
गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय,
भोकरदन, तालुका भोकरदन, जिल्हा जालना

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१६४१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०९-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, भोकरदन, तालुका भोकरदन, जिल्हा जालना - श्री. आर. एम. देवकर | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, भोकरदन, तालुका भोकरदन, जिल्हा जालना - श्री. आर. एस. लोखंडे | : | उपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष - एस. डी. सपकाळ, शाखा अभियंता | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०१-०८-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | निरंक |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०५-०९-२००९ |

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख निरंक

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १८-११-२००९

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, जन माहिती अधिकारी हे वैद्यकीय कारणास्तव सुनावणीस उपस्थित राहू शकले नाहीत. त्याचप्रमाणे अपिलार्थीच्या दिनांक ०१-०८-२००९ रोजीच्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०१-०९-२००९ रोजी व्यक्तिशः माहिती पुरविली आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात व्यक्तिशः उपस्थित राहून आवश्यक ती माहिती घेऊन माहिती मिळाल्याबाबतची पोच दिली आहे. यानंतर अपिलार्थीने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपुरी माहिती मिळाली म्हणून अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर अर्जात जी माहिती मागितली नाही अशी दलितवस्तीची माहिती अपिलार्थी मागत आहेत व ती सुध्दा द्यावी असा निर्णय दिला. यानंतर अपिलार्थीने दिनांक २७-१०-२००९ रोजी व्यक्तिशः माहिती नेली व याबाबत अपिलार्थीने पोच दिल्याचे आढळून येत आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी आज रोजी केलेल्या खुलाशासमर्थनार्थ झेरॉक्स प्रती आयोगास सादर केल्या आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत त्यामुळे त्यांची बाजू आयोगास ऐकून घेता आली नाही. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद विचारात घेता अपिलार्थीस संपूर्ण माहिती मिळाली आहे असे दिसते. याबरहुकूम खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०९-१२-२०१०** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. डिगांबर पाटीलबा कुदर, मु. बोरगांव जहा. पो. सिपोरा बा. तालुका भोकरदन, जिल्हा जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, भोकरदन, तालुका भोकरदन, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, भोकरदन, तालुका भोकरदन, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. बाबुराव देवराव जायभाये, : अपीलकर्ता
शिवकृपा निवास, शिवनगर, घाटी दवाखान्याजवळ,
जालना

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, जालना
जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना

१ अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१६४२
२ सुनावणीची तारीख दि. ०९-१२-२०१०
३ आज रोजीची उपस्थिती
३.१ अपिलार्थी : अनुपस्थित
३.२ जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लेखाधिकारी, : उपस्थित
वित्त विभाग, जिल्हा परिषद, जालना
- श्री. वैजनाथ राजाराम शेळके
३.३ जन अपिलीय अधिकारी तथा : उपस्थित
मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, जालना
- श्री. किरणकुमार धोत्रे

४ जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख दि. २९-०८-२००९
५ जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख निरंक
६ प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ३०-०९-२००९
७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख निरंक
८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १९-११-२००९

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २९-०८-२००९ रोजीच्या अर्जान्वये त्यांच्या मूळ सेवापुस्तिकेच्या प्रथम पृष्ठाची झेरॉक्स प्रत व त्याची साक्षांकीत प्रत अशी माहिती व्यक्तिशः मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अर्जाची कोणत्याही प्रकारे दखल न घेतल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने दिनांक ३०-०९-२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील सादर केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २७-१०-२००९ रोजी सुनावणी घेऊन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस दहा दिवसामध्ये विनामूल्य माहिती द्यावी असा निर्णय दिला. ही माहिती अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून दिनांक १३-०७-२०१० रोजी व्यक्तिशः प्राप्त करुन घेतली आहे असे जन माहिती अधिकारी यांनी दाखल केलेल्या कागदपत्रावरुन दिसते. जन माहिती अधिकारी यांनी एक प्रत पोस्टाने अपिलार्थीस दिनांक २८-०६-२०१० रोजी पाठविली जी प्रत अपिलार्थीस प्राप्त न होता दिनांक ०८-०७-२०१० ला परत आली. अपिलार्थीस माहिती प्राप्त झाल्याने त्यांचे समाधान झाल्याचे दिसते. जन माहिती अधिकारी यांनी आज असा खुलासा केला की, जन माहिती अधिकारी तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी नुकताच या ठिकाणी कार्यभार घेतला आहे. अपिलार्थीचे सेवापुस्तक शोधण्यास वेळ लागला. तथापि ते लवकरात लवकर माहिती देण्यास प्रयत्नशील आहेत. अपिलार्थीने स्वतःच्या सेवापुस्तिकेमधील माहिती मुलाच्या जातीचे प्रमाणपत्र काढण्यासाठी मागितली होती. आज त्यांना माहिती पुरविण्यात आलेली आहे. तथापि अशा प्रकरणात यापुढे दक्ष राहून तत्पर कार्यवाही योजने आवश्यक आहे. मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी याबाबत परिपत्रक काढावे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०९-१२-२०१०**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बाबुराव देवराव जायभाये, शिवकृपा निवास, शिवनगर, घाटीदवाखान्याजवळ, जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लेखाधिकारी, वित्त विभाग, जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. राम गोरखनाथ पार्वे, : अपीलकर्ता
मु. पो. चिंचखेड, तालुका अंबड, जिल्हा जालना

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग,
घनसावंगी, तालुका घनसावंगी, जिल्हा जालना

जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक २, जालना

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१६५१ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०९-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. राम गोरखनाथ पार्वे | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, घनसावंगी, तालुका घनसावंगी, जिल्हा जालना - श्री. कांडलीकर एम. जी. | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक २, जालना - श्री. डी. डी. चाटे | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १०-०८-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | निरंक |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ११-०९-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २९-१०-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २४-१२-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक १०-०८-२००९ रोजीच्या अर्जावरील आवश्यक माहिती त्यांना दिनांक १२-०७-२०१० रोजी पोस्टाने पाठविण्यात आली आहे परंतु ती त्यांना प्राप्त झाली नाही व माहिती परत आली. आज रोजी त्यांनी आयोगासमोर माहिती उपलब्ध आहे असे सांगितले. सदर माहिती अपिलार्थीस देण्यात आली व अपिलार्थीने स्वीकारली. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणात दिनांक २८-१०-२००९ रोजी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय दिला होता की, अपिलार्थीने मागितलेली सर्व माहिती त्यांना सात दिवसाच्या आत विनामूल्य द्यावी.

प्रकरणात अपिलार्थीस माहिती देण्यासाठी विलंब झाल्याचे आढळून येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, उपविभागीय अभियंता म्हणून ते दिनांक १५-०१-२०१० रोजी हजर झाल्यानंतर त्यांनी ही माहिती अपिलार्थीस दिलेली आहे. प्रकरणात तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, घनसावंगी, तालुका घनसावंगी, जिल्हा जालना यांच्याकडून अपिलार्थीने मागितलेली माहिती देण्यासाठी विलंब झालेला आहे. याबाबत कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक २, जालना यांनी सखोल चौकशी करावी व दोषी आढळल्यास दोषीवर यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई योजावी, अशी त्यांना शिफारस करण्यात येत आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक २, जालना यांनी या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी झालेल्या विलंबाबाबत सखोल चौकशी करावी व दोषी आढळल्यास दोषीवर यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करावी, अशी त्यांना शिफारस करण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०९-१२-२०१०**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. राम गोरखनाथ पार्वे, मु. पो. चिंचखेड, तालुका अंबड, जिल्हा जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, घनसावंगी, तालुका घनसावंगी, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक २, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. संजय जवाहरलाल गुप्ता, : अपीलकर्ता
मु. पो. पिंपळगांव रेणुकाई, तालुका भोकरदन,
जिल्हा जालना

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, भोकरदन,
तालुका भोकरदन, जिल्हा जालना

जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जालना

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१६५२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०९-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, भोकरदन, तालुका भोकरदन, जिल्हा जालना - श्री. चव्हाण शेषराव काशीनाथ, तत्कालीन जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जालना - श्री. पी. जी. भागवत | : | उपस्थित |
| | तत्कालीन जन अपिलीय अधिकारी श्री. एम. ए. रऊफ | | उपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष - श्री. नागरे, शाखा अभियंता | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २४-०६-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | निरंक |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. २३-०८-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | निरंक |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २३-११-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी तत्कालीन जन माहिती अधिकारी आणि सध्याचे व तत्कालीन जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी सर्व उपस्थितांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

सुनावणीच्या वेळी सध्याचे जन माहिती अधिकारी हे नागपूर अधिवेशनाच्या कामकाजामुळे हजर राहू शकले नाहीत असे जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले. आयोगाने ही बाब मान्य केली.

अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २४-०६-२००९ रोजीच्या अर्जान्वये शाखा अभियंता श्री. नागरे यांनी हाताळलेल्या सी. आर. व एस. आर. अंतर्गत कामाबद्दलचा सन २००७-२००९ पर्यंतच्या कालावधीतील तपशील मागितला आहे.

अपिलार्थीने मागितलेला तपशील हा उप अभियंता यांच्या कार्यालयात उपलब्ध असतो तथापि उप अभियंता यांनी त्रयस्थ पक्ष श्री. नागरे यांना दिनांक १०-०७-२००९ रोजी पत्र लिहून त्यांच्याकडून ही माहिती मागितली. श्री. नागरे यांनी ही माहिती आजपावेतो दिलेली नाही. जन माहिती अधिकारी यांची माहिती मागण्याची कार्यवाही सुरु आहे. ही माहिती कार्यालयात उपलब्ध असते याबाबत कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जालना यांनी मार्गदर्शन केलेले नाही असे आयोगास आढळून येत आहे.

तत्कालीन जन माहिती अधिका-याने आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने प्रथम अपील केले नाही. दिनांक २३-११-२००९ रोजी आयोगाकडे अपिलार्थीने व्दितीय अपील दाखल केले आहे त्याची आज सुनावणी आहे. जन माहिती अधिकारी यांनी आज आयोगास सांगितले की, अपिलार्थीस द्यावयाची माहिती एकूण ६६ पृष्ठे त्यांच्याकडे आज रोजी उपलब्ध आहे. जन माहिती अधिकारी यांनी ही माहिती अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाने मिळेल अशी कार्यवाही योजने आता आवश्यक आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून हे प्रकरण हाताळण्यात कसूर झाल्याचे आयोगास आढळून येत आहे. जन माहिती अधिकारी यांना आज रोजी पुरेशी संधी देऊनही ते कोणताही खुलासा आयोगास देऊ शकले नाहीत. त्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांच्यावर रुपये २५००० इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा लेखी खुलासा तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना द्यावा लागेल.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

१. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागितलेल्या व त्यांच्याजवळ उपलब्ध असलेल्या सर्व माहितीच्या झेरॉक्स प्रती वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाने हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवाव्यात.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. शेषराव काशीनाथ चव्हाण यांनी या प्रकरणात विहित मुदतीत तसेच त्यानंतर सुध्दा अपिलार्थीस माहिती देण्यास कसूर केला आहे त्यामुळे त्यांच्यावर रुपये २५,००० इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी आयोगास हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत कागदोपत्री पुराव्यासह सादर करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०९-१२-२०१०**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. संजय जवाहरलाल गुप्ता, मु. पो. पिंपळगांव रेणुकाई, तालुका भोकरदन, जिल्हा जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, भोकरदन, तालुका भोकरदन, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. शेषराव काशीनाथ चव्हाण, सहायक अभियंता-१, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, परतूर, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (नोंदणीकृत टपालाव्दारे)

४. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. अभयकुमार बलिराम यादव,<br>रहेमानगंज, रामचंद्र आर्य चौक, जालना | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>उप अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, जालना | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१६५७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०९-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. अभयकुमार बलिराम यादव | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, जालना - श्री. सो. शं. खिलारे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना - प्रतिनिधी - श्री. एस. ए. इतीराज, शाखा अभियंता | : | उपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष - श्री बी. जे. त्यागी, शाखा अभियंता | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २८-०८-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०४-०९-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २९-०९-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | निरंक |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १४-१२-२००९

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २७-०८-२००९ रोजीच्या अर्जान्वये रोजगार हमी योजना अंतर्गत झालेल्या २१ पाझर तलावाच्या पतमर्यादेसंदर्भात गावनिहाय काही माहिती सन २००८-२००९ या कालावधीची मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले की, त्यांनी दिनांक ०४-०९-२००९ च्या पत्रान्वये अपिलार्थीस ८२०० रुपये भरणा करावा म्हणजे माहिती पुरविण्यात येईल असे कळविले होते. यावर अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ११-०९-२००९ रोजीच्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी यांना शुल्कासंदर्भात तपशील दिला नसल्याबाबत कळविले. यावर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक १६-०९-२००९ च्या पत्रान्वये अपिलार्थीस प्रत्येकी रुपये ८००० व रुपये ८२०० रुपयाचा भरणा करावा म्हणजे माहिती पुरविण्यात येईल असे कळविले होते. ४१०० प्रती दोघांच्या वेगवेगळ्या असून त्याचा खर्च त्याप्रमाणे कळविला आहे असे अपिलार्थीस कळविले._तथापि यानंतर या प्रकरणात पुढे काही प्रगती झाली किंवा कसे हे आयोगास आढळून आले नाही.

आज रोजी जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध आहे असे कबूल केले.

आज रोजी अपिलार्थीने त्यांनी मस्टरच्या प्रती मागितल्या नाहीत असे आयोगास सांगितले. तसा त्यांनी त्यांच्या दिनांक ११-०९-२००९ रोजीच्या पत्रामध्ये उल्लेख केला आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर ऊहापोह केल्याप्रमाणे उर्वरीत माहिती अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाने सशुल्क पुरवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०९-१२-२०१०** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अभयकुमार बलिराम यादव, रहेमानगंज, रामचंद्र आर्य चौक, जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. विकासकुमार बागडी, : अपीलकर्ता
नाथ गल्ली, सदर बाजार, जालना

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
तालुका कृषि अधिकारी कार्यालय, सामानगाव, जालना
जन अपिलीय अधिकारी, :
तालुका कृषि अधिकारी कार्यालय, सामानगाव, जालना

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१७१६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०९-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, जालना - श्री. एस. जे. काकडे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, जालना - श्री. सी. के. बहुरे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २९-०९-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | निरंक |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७-११-२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०५-०१-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २९-०१-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास या प्रकरणाची वस्तुस्थिती पुरविण्यासाठी सुनावणी पुढे ढकलण्याची विनंती केली. जन माहिती अधिकारी यांची विनंती मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>अंतरीम आदेश</u>**

अपील प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणी दिनांक ०६-०१-२०११ रोजी दुपारी ०३-०० वाजता ठेवण्यात येत आहे. पुढील सुनावणीस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०९-१२-२०१०**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. विकासकुमार बागडी, नाथ गल्ली, सदर बाजार, जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. अभयकुमार बलिराम यादव,<br>रहेमानगंज, रामचंद्र आर्य चौक, जालना | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, घनसावंगी, तालुका घनसावंगी, जिल्हा जालना | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जालना | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१७०० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०९-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. अभयकुमार बलिराम यादव | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, घनसावंगी, तालुका घनसावंगी, जिल्हा जालना - श्री. कांडलीकर एम. जी. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक २, जालना - श्री. डी. डी. चाटे | : | उपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष - श्री. दगुला आर. आर., श्री. मनगटे यु. के., श्री. आजमी एम. एम. | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २०-०७-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | निरंक |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २४-०८-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १६-०९-२००९ |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १४-१२-२००९

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व तीनही त्रयस्थ पक्ष उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी सर्व संबंधितांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपिलार्थीने मागितलेली सर्व माहिती अपिलार्थीस दिनांक ०६-०८-२०१० रोजी पुरविण्यात आलेली आहे. अपिलार्थीने ही बाब आयोगासमोर मान्य केली. तसेच अपिलार्थी यांच्या दिनांक ०७-०८-२०१० रोजीच्या पत्राची याबाबतची प्रत आयोगास प्राप्त झाली आहे. अपिलार्थीने उप अभियंता सार्वजनिक बांधकाम उपविभाग, घनसावंगी यांना माहिती मिळाल्याचे कळविल्याचे त्यावरुन आढळून आले आहे. यासदर्भातील अपिलार्थीचे दिनांक ०९-१२-२०१० चे पत्र आयोगासमोर आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०९-१२-२०१०** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अभयकुमार बलिराम यादव, रहेमानगंज, रामचंद्र आर्य चौक, जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, घनसावंगी, तालुका घनसावंगी, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक २, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. राजू भुजंगराव तारे,<br>बाळानगर, अंबड, तालुका अंबड, जिल्हा जालना | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, घनसावंगी,<br>तालुका घनसावंगी, जिल्हा जालना | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी,<br>लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१६८५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०९-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, घनसावंगी, तालुका घनसावंगी, जिल्हा जालना - श्री. बी. जे. पांचाळ | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना - प्रतिनिधी - श्री. एस. ए. इतीराज, शाखा अभियंता | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २०-०७-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | निरंक |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३१-०८-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | निरंक |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९-११-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २०-०७-२००९ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन २००६ ते २००८ डिसेंबर पर्यंत या कालावधीतील दोन कामाची माहिती, मजुराचे हजेरीपट, अंदाजपत्रकांच्या छायांकीत प्रतीची मागणी केली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपिलार्थीने मागितलेल्या माहितीची व्याप्ती फार मोठ्या प्रमाणावर असल्यामुळे त्यांना निरीक्षण करण्याचे कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपिलार्थीने कार्यालयात येऊन संबंधित कागदपत्राचे निरीक्षण केले आहे.

याबाबत अपिलार्थीचा दिनांक ३०-०६-२०१० रोजीचा अर्ज आज रोजी आयोगासमोर आहे व या अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना माहिती दाखविली असल्याकारणाने माहितीसाठीचे व्दितीय अपील रद्द करण्यात यावे अशी त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी अपिलार्थी उपस्थित नाहीत तथापि वरील बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०९-१२-२०१०** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. राजू भुजंगराव तारे, बाळानगर, अंबड, तालुका अंबड, जिल्हा जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, घनसावंगी, तालुका घनसावंगी, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. नंदलाल जी. बठेजा,<br>बरवार गल्ली, जालना | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी,<br>अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना | : | |
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१६७७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०९-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, जालना - श्री. आर. एस. जाधव | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, जालना - श्री. आर. जे. कोमलवार | : | उपस्थित |
| ३.४ | श्री. किरणकुमार धोत्रे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, जालना | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३१-०३-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | निरंक |
| ६ | प्रथम अपील केल्याचा तारीख | | दि. २४-०७-२००९ |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १४-०८-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १६-११-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, जालना उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी सर्व उपस्थितांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता तसेच मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, जालना (साक्षी) यांनी आयोगास असे अवगत केले की, जिल्हा परिषद, जालनाच्या सिंचन विभागात सन २००८-२००९ या वर्षात २१ कोटी रुपयांच्या कामाची अनियमितता आढळून आली आहे व याबाबत काही कर्मचारी / अधिकारी (११) यांच्यावर विभागीय चौकशीची प्रक्रिया प्रगतीपथावर आहे. काही कनिष्ठ अभियंता / शाखा अभियंता यांची चौकशी पूर्ण झालेली आहे व वरिष्ठ अधिका-यांची चौकशी प्रलंबीत आहेत. अपिलार्थीने २१ कोटी रुपयाच्या कामावरील मूळ देयकाच्या सत्यप्रती मागितल्या आहेत, तसेच दोषी अधिकारी / कर्मचारी यांची माहिती मागितली आहे. दोषी अधिकारी / कर्मचा-यांची माहिती अपिलार्थीस दिनांक २७-०८-२००९ रोजी देण्यात आली आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या सुनावणीच्या वेळी त्यांनी देयकाच्या सत्यप्रती अपिलार्थीस द्याव्यात असा निर्णय घेतला आहे. त्याचप्रमाणे प्रथम अपील निर्णयामध्ये दिलेल्या निर्णयानुसार दिनांक ०४-१२-२०१० रोजी देयकाच्या सत्यप्रती अपिलार्थीस दिल्या आहेत व अपिलार्थीने त्याबाबत पोच दिली आहे. चौकशी प्रक्रीया हाती घेतली असल्यामुळे मध्यंतरीच्या कालावधीमध्ये कागदपत्रे व संबंधित नस्ती चौकशीच्या ताब्यात गेली असल्यामुळे दिनांक ०४-१२-२०१० रोजी माहिती दिली आहे असेही आयोगाच्या नजरेस आणून देण्यात आले आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०९-१२-२०१०** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. नंदलाल जी. बठेजा, बरवार गल्ली, जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. अभयकुमार बलिराम यादव,<br>रहेमानगंज, रामचंद्र आर्य चौक, जालना | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>उप अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, घनसावंगी, तालुका घनसावंगी, जिल्हा जालना | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१६६३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०९-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. अभयकुमार बलिराम यादव | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, घनसावंगी, तालुका घनसावंगी, जिल्हा जालना - श्री. बी. जे. पांचाळ | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना - प्रतिनिधी - श्री. एस. ए. इतीराज, शाखा अभियंता | : | उपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष - श्री. बी. जे. पांचाळ | : | उपस्थित |
| ३.५ | त्रयस्थ पक्ष - श्री ब्रम्हप्रकाश, श्री. जाधव, श्री. दोडके, श्री. चव्हाण | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २०-०७-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | निरंक |

| | | | |
|---|---|---|---|
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | २४-०८-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. | २२-०९-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | १४-१२-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. त्रयस्थ पक्ष श्री. बी. जे. पांचाळ उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपिलार्थीचा अर्ज प्राप्त झाला त्यावेळी जन माहिती अधिकारी म्हणून दुसरे अधिकारी (श्री. ब्रम्हप्रकाश) होते. सध्याच्या जन माहिती अधिका-याने कामकाज हाती घेतल्याबरोबर अपिलार्थीस माहिती दिली आहे. अपिलार्थीस ही माहिती मिळालेली आहे असे अपिलार्थीने कबूल केले.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०९-१२-२०१०** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अभयकुमार बलिराम यादव, रहेमानगंज, रामचंद्र आर्य चौक, जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, घनसावंगी, तालुका घनसावंगी, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. राजेंद्र भानुदास कावळे, : अपीलकर्ता
मु. पो. गोलापांगरी, तालुका जिल्हा जालना

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
अध्यक्ष / सचिव, गोलापांगरी शिक्षण प्रसारक मंडळ,
गोलापांगरी, तालुका जिल्हा जालना

जन अपिलीय अधिकारी तथा :
सहायक धर्मादाय आयुक्त, जालना

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१६६२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०९-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष, गोलापांगरी शिक्षण प्रसारक मंडळ, गोलापांगरी, तालुका जिल्हा जालना - श्री. संपत भानाजी मोरे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, जालना | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १८-०८-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०१-१०-२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०५-०९-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०६-११-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०-११-२००९ |

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले की, अपिलार्थीस व्यक्तिशः कागदपत्रे पाहण्याची संधी देण्यात आली होती आणि त्याप्रमाणे त्यांनी कागदपत्रे पाहिली व अपिलार्थी यांनी ही बाब मान्य केली व अपिलार्थीस दिनांक ०८-१२-२०१० रोजी उपलब्ध माहिती व्यक्तिशः प्राप्त झाली आहे व ते त्यांचे व्दितीय अपील मागे घेत आहे असे आयोगास सांगितले. आयोगापुढे त्यांच्या दिनांक १०-१२-२०१० रोजीच्या पत्रान्वये विचाराधीन व्दितीय अपील रद्द करण्याची विनंती केली आहे. तथापि माहिती देण्यास विलंब झाल्याचे आढळून येत आहे असे भविष्यात होऊ नये म्हणून कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक २, जालना यांनी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व अधिका-यांना जन माहिती अधिका-यास माहिती अधिकार अधिनियमाशी संबंधित कार्यवाहीमध्ये सहकार्य करण्यासंदर्भात व जन माहिती अधिका-यास वेळेत माहिती देण्यासाठी परिपत्रकाव्दारे सर्वांना सूचित करणे आवश्यक आहे त्याप्रमाणे त्यांनी कार्यवाही करावी.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १०-१२-२०१०**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सय्यद नदीम सय्यद फहीम, दाना बाजार, जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक २, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग

क्रमांक २,  जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. लक्ष्मण बापूराव कोरडे,<br>शनिमंदिराजवळ, जुना जालना, जालना | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>उप अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१७६१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १४-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, जालना - श्री. सोपान शंकरराव खिलारे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना - प्रतिनिधी - श्री. एस. इतीराज, शाखा अभियंता | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४-१२-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | निरंक |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १६-०१-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | निरंक |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २१-०२-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले की, अपिलार्थीने मागितलेली सर्व माहिती देता येईल फक्त मोजमाप पुस्तिकाच्या झेरॉक्स प्रती या तत्कालीन कनिष्ठ अभियंता श्री. सी. व्ही. कुलथे (सध्या शाखा अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) सर्वेक्षण उपविभाग, नाथनगर (उत्तर), पैठण) यांच्या ताब्यात आहेत व त्यांची बदली झाल्यानंतर कार्यभार हस्तांतरणाच्या वेळी त्यांनी या मोजमाप पुस्तिका हस्तांतरीत केलेल्या नाहीत. कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना यांच्यामार्फत वेळोवेळी मोजमाप पुस्तिका हस्तांतरीत करण्याविषयी कळविण्यात आले आहे आणि कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना यांच्या दिनांक ०९-११-२०१० रोजीच्या पत्रान्वये या मोजमाप पुस्तिका श्री. सी. व्ही. कुलथे यांनी हस्तांतरीत केल्या नाहीत तर त्यांच्यावर फौजदारी गन्हा दाखल करण्यात येईल असेही कळविण्यात आले आहे. तथापि आजपर्यंत त्यांना श्री. सी. व्ही. कुलथे यांच्याकडून मोजमाप पुस्तिका प्राप्त झालेल्या नाहीत. या सर्व बाबींची आयोगाने गंभीर दखल घेतली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत त्यामुळे त्यांची बाजू ऐकून घेता आली नाही. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे उपलब्ध असलेली सर्व माहिती अपिलार्थीस द्यावी व अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद यांनी श्री. सी. व्ही. कुलथे, शाखा अभियंता यांच्याकडून सदरच्या मोजमाप पुस्तिका प्राप्त होतील यासाठी योग्य ती कार्यवाही करणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

१. जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, जालना यांनी त्यांच्याकडे उपलब्ध असलेली सर्व माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

२. अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद श्री. पाझारे यांनी वर नमूद केल्याप्रमाणे मोजमाप पुस्तिकांचे हस्तांतरण १५ दिवसाच्या आत होईल अशी कार्यवाही योजावी. आवश्यकता असल्यास शाखा अभियंता श्री. सी. व्ही. कुलथे यांना तात्काळ निलंबीत करण्यात यावे अशी शिफारस आयोग करीत आहे. मोजमाप पुस्तिका प्राप्त झाल्याबरोबर त्याच्या झेरॉक्स प्रती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विनामूल्य पाठवाव्यात.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १४-१२-२०१०** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. लक्ष्मण बापूराव कोरडे, शनिमंदिराजवळ, जुना जालना, जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. चंद्रकांत रुस्तुमराव मोरे, : अपीलकर्ता
व्दारा - एस. के. जोनवाळ,
प्लॉट नं. ४, प्रा. रावसाहेब ढवळे यांच्या घराजवळ,
भाग्यनगर, जुना जालना

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
लेखाधिकारी (शिक्षण), जालना
जन अपिलीय अधिकारी तथा :
शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१७६६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १४-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. चंद्रकांत रुस्तुमराव मोरे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ लेखा परिक्षक, लेखाधिकारी (शिक्षण) कार्यालय, जालना - श्री. डी. जी. कुलकर्णी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद - प्रतिनिधी - श्री. तुपे बी. ए., सहायक शिक्षण संचालक | : | उपस्थित |
| ३.४ | श्री. अनिल त्रिंबकराव वनगुजरे, लेखाधिकारी (शिक्षण), जालना | : | उपस्थित |
| ३.५ | श्री. डुकरे एन. एन. (मुख्याध्यापक) | : | उपस्थित |
| ३.६ | त्रयस्थ पक्ष - श्री. बी. बी. जिगे | : | अनुपस्थित |

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. २४-०६-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २३-०७-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०६-०८-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १२-०८-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १०-०९-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी व श्री. डुकरे एन. एन. (मुख्याध्यापक), श्री. अनिल त्रिंबकराव वनगुजरे, लेखाधिकारी (शिक्षण), जालना उपस्थित आहेत. त्रयस्थ पक्ष श्री. बी. बी. जिगे अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी सर्व उपस्थितांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, संबंधित मुख्याध्यापकाची मूळ सेवापुस्तिका गहाळ झाल्यामुळे दुसरी सेवापुस्तिका तयार करुन मुख्याध्यापकाकडून लेखाधिकारी (शिक्षण), जालना यांच्याकडे पाठविण्यात आली व लेखाधिकारी (शिक्षण), जालना यांनी पडताळणी करुन त्यास मान्यता दिलेली आहे. या व्यतिरिक्त त्यांच्याकडे याबाबतची संचिका नाही. या पार्श्वभूमीवर लेखाधिकारी (शिक्षण), जालना यांनी सेवापुस्तिकेची पडताळणी करुन ज्या ठिकाणी त्यांची मान्यता दिली असेल त्या पृष्ठाची झेरॉक्स प्रत अपिलार्थीस विनामूल्य द्यावी, असे ठरले. त्याचप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी लेखाधिकारी (शिक्षण) जालना यांच्या मदतीने मुख्याध्यापकाकडून ज्या माहितीवर दुय्यम सेवापुस्तक तयार केले आहे,त्याच्या प्रती प्राप्त करुन अपिलार्थीस पुरवाव्यात. अपिलार्थीने यासंदर्भात शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांच्याकडेही माहितीचा अर्ज केलेला आहे त्यावर आयोगाने यापूर्वी आदेश देऊन माहिती पुरविण्यात यावी असे आदेश दिले आहे. तथापि त्यांना माहिती प्राप्त झाली नाही असे अपिलार्थीने सांगितले. यावर आयोगाने त्यांना सांगितले की, त्या अपिलासंदर्भात आपण माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १८ खाली आयोगाकडे तक्रार करु शकतात.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी लेखाधिकारी (शिक्षण), जालना यांच्या मदतीने मुख्याध्यापकाकडून उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे माहितीच्या प्रती प्राप्त कराव्यात व ही माहिती आणि सेवापुस्तिकेमध्ये ज्या ठिकाणी मान्यता दिली असेल त्याची साक्षांकीत प्रत वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवाव्यात.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १४-१२-२०१०** **खंडपीठ औरंगाबाद**

--------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. चंद्रकांत रुस्तुमराव मोरे, व्दारा - एस. के. जोनवाळ, प्लॉट नं. ४, प्रा. रावसाहेब ढवळे यांच्या घराजवळ, भाग्यनगर, जुना जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ लेखा परिक्षक, लेखाधिकारी (शिक्षण) कार्यालय, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. सय्यद नदीम सय्यद फहीम,<br>दाना बाजार, जालना | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>प्राचार्य, लालबहादूर शास्त्री महाविद्यालय, परतूर,<br>जिल्हा जालना | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>अध्यक्ष, लालबहादूर शास्त्री महाविद्यालय, परतूर,<br>जिल्हा जालना | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१७८७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १४-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. सय्यद नदीम सय्यद फहीम | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, लालबहादूर शास्त्री महाविद्यालय, परतूर, जिल्हा जालना | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा अध्यक्ष, लालबहादूर शास्त्री महाविद्यालय, परतूर, जिल्हा जालना | : | अनुपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष - श्री. सुसर, प्राध्यापक | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७-०७-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १२-०८-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २७-०५-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहेत.

अपील प्रकरणात जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांची बाजू ऐकून घेणे आयोगास आवश्यक आहे. त्यामुळे प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, लालबहादूर शास्त्री महाविद्यालय, परतूर, जिल्हा जालना व जन अपिलीय अधिकारी यांनी स्वतः उपस्थित राहावे. सहसंचालक (उच्च शिक्षण),औरंगाबाद यांची साक्ष आवश्यक असल्याने त्यांनी उपस्थित राहणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>अंतरीम आदेश</u>**

या व्दितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणी दिनांक ०६-०१-२०११ रोजी दुपारी ०३-०० वाजता ठेवण्यात येत आहे. पुढील सुनावणीस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व सहसंचालक (उच्च शिक्षण),औरंगाबाद यांनी देखील सुनावणीस व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १४-१२-२०१०** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सय्यद नदीम सय्यद फहीम, दाना बाजार, जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, लालबहादूर शास्त्री महाविद्यालय, परतूर, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अध्यक्ष, लालबहादूर शास्त्री महाविद्यालय, परतूर, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सहसंचालक (उच्च शिक्षण) औरंगाबाद यांची साक्ष आवश्यक असल्याने त्यांनी सुनावणीस उपस्थित राहणे आवश्यक आहे.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. चंद्रकांत रुस्तुमराव मोरे,<br>व्दारा - एस. के. जोनवाळ,<br>प्लॉट नं. ४, प्रा. रावसाहेब ढवळे यांच्या घराजवळ,<br>भाग्यनगर, जुना जालना | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक, नेहरु विद्यालय, गोलापांगरी,<br>तालुका जिल्हा जालना | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, जालना | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१७९४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १४-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. चंद्रकांत रुस्तुमराव मोरे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, नेहरु विद्यालय, गोलापांगरी, तालुका जिल्हा जालना - श्री. डुकरे एन. एन. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, जालना - श्री. एस. आर. शिंदे | : | उपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष श्री. एस. एन. काळे, स. शिक्षक | : | उपस्थित |
| | श्री. डुकरे एन. एन. (मुख्याध्यापक) | | उपस्थित |
| | श्री. जी. के. राऊत, श्री. बी. बी. जिगे, श्री. पी. बागल | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १५-०१-२००९ |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. | २७-०१-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | ०२-०३-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. | २८-०४-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | २७-०५-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्षापैकी श्री. डुकरे एन. एन. (मुख्याध्यापक), श्री. एस. एन. काळे, स. शिक्षक उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी सर्व उपस्थितांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, नेहरु विद्यालय, गोलापांगरी, तालुका जिल्हा जालना यांनी आयोगास सांगितले की, अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये २८ चा भरणा करण्याबाबत कळविले असता अपिलार्थीने या शुल्काचा भरणा केलेला आहे व त्यांना दिनांक २८-०४-२००९ रोजी माहिती देण्याचा प्रयत्न केला तथापि त्यांना ती मिळाली नाही.

आज रोजी माहिती तयार आहे. जन माहिती अधिकारी यांनी ती अपिलार्थीस आयोगासमोर दिली. अपिलार्थीने ती स्विकारली आहे. अपिलार्थीने दिलेल्या माहितीची पाहणी करावी व पुढील कार्यवाही करावी.

वरील बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १४-१२-२०१०** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. चंद्रकांत रुस्तुमराव मोरे, व्दारा - एस. के. जोनवाळ, प्लॉट नं. ४, प्रा. रावसाहेब

ढवळे यांच्या घराजवळ, भाग्यनगर, जुना जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, नेहरु विद्यालय, गोलापांगरी, तालुका जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. शामराव सुंदरराव खरात,<br>मु. पो. पाथरवाला (बु.), तालुका अंबड, जिल्हा जालना | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>सहायक निबंधक (प्रशासन), सहकारी संस्था संलग्न, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड | : | |
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१८४९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १४-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. शामराव सुंदरराव खरात | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक (प्रशासन), सहकारी संस्था संलग्न, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड - श्री. कदम ए. एस. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड - श्री. बी. एस. जाधव | : | उपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष - श्री. गायकवाड एस. एन. सहायक निबंधक, कळंब,जि.उस्मानाबाद | : | उपस्थित |
| | श्री. गुंजकर एम. जी. सहायक निबंधक, लातूर | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २८-०८-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २६-१०-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. - |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ११-१२-२००९

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी सर्व उपस्थितांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले की, त्यांनी दिनांक २५-०९-२००९ रोजी अपिलार्थीस माहिती पुरविली आहे. तथापि अपिलार्थीने माहिती अपूर्ण असल्यामुळे जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २१-११-२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस उर्वरीत माहिती द्यावी असे जन माहिती अधिका-यास आदेशित केले. जन माहिती अधिका-याने दिनांक २३-११-२००९ रोजी माहिती दिली. आज रोजी व्दितीय अपील सुनावणीमध्ये अपिलार्थीने असे सांगितले की, त्यांना अजूनही पूर्ण माहिती मिळालेली नाही. आयोगाने त्यांना सूचित केले की, त्यांना कोणती माहिती मिळाली नाही तेवढी सांगावी म्हणजे जन माहिती अधिका-यास सांगता येईल. त्यावर अपिलार्थीने हिनाशाही नागरी बँकेचे ऑडिट रिपोर्ट ही माहिती मिळाली नाही, असे सांगितले.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस हिनाशाही बॅंकेच्या ऑडिट रिपोर्टची प्रत आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य द्यावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १४-१२-२०१०** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शामराव सुंदरराव खरात, मु. पो. पाथरवाला (बु.), तालुका अंबड, जिल्हा जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक (प्रशासन), सहकारी संस्था संलग्न, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. विकास कुमार बागडी, : अपीलकर्ता
नाथ गल्ली, सदर बाजार, जालना

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
सहायक कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जालना

जन अपिलीय अधिकारी, :
सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक - २, जालना

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१३४० | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १४-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. विकास कुमार बागडी | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता (प्र.), सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक - २, जालना - श्री. पवार एस. एम. | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक - २, जालना - प्रतिनिधी - श्री. एच. जी. कंडाळे, प्रमुख लिपिक | : उपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष - श्री. चाटे, कार्यकारी अभियंता | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. २३-०१-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | निरंक |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १३-०३-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | निरंक |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०३-०६-२००९

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहेत. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक - २, जालना यांना कोर्टात जावे लागले त्यामुळे त्यांनी त्यांचे प्रतिनिधी म्हणून प्रथम लिपिक यांना सुनावणीसाठी पाठविले आहे.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थीने मागितलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस दिनांक ०८-१२-२०१० रोजीच्या पत्राद्वारे पाठविलेली आहे. ती माहिती अपिलार्थीस प्राप्त झाली आहे असे अपिलार्थीने आयोगासमोर सांगितले. यासंदर्भात अपिलार्थीने त्यांच्या पत्र दिनांक १४-१२-२०१० रोजीच्या पत्रान्वये आयोगास विनंती केली आहे की, त्यांना जन माहिती अधिका-याकडून माहिती प्राप्त झालेली असून त्यांची कोणतीही तक्रार नाही त्यामुळे विचाराधीन अपील रद्द करण्यात यावे.

वरील बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १४-१२-२०१०** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. विकास कुमार बागडी, नाथ गल्ली, सदर बाजार, जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता (प्र.), सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक - २, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक - २, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. विकासकुमार बागडी,<br>नाथ गल्ली, सदर बाजार, जालना | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>तालुका कृषि अधिकारी, जाफ्राबाद, जिल्हा जालना | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी,<br>तालुका कृषि अधिकारी कार्यालय, जाफ्राबाद, जिल्हा जालना | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१७६० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १४-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. विकासकुमार बागडी | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, जाफ्राबाद, जिल्हा जालना - श्री. पवार परशुराम सीताराम | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, जाफ्राबाद, जिल्हा जालना - श्री. भगवान नरसिंगू बोंदरवाड | : | उपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष - श्री. नागरे (कृषि पर्यवेक्षक) | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २४-१२-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०१-०१-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २२-०१-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २१-०२-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७-०४-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी सर्व उपस्थितांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले की, त्यांनी २३-०९-२०१० रोजी कार्यभार घेतला त्यापूर्वी श्री. एस. आर. वाघ हे कार्यरत होते. त्यांनी आयोगास पुढे असे सांगितले की, अपिलार्थीने सन २००६ ते २००८ या कालावधीची व्यापक माहिती मागितली आहे. अंदाजे ५००० पाने आहेत त्यामुळे ती माहिती देण्याचे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी नाकारले. जन अपिलीय अधिकारी यांनी सांगितले की, तत्कालीन जन अपिलीय अधिकारी (श्री. एम. एस. बोईनवार) यांनी अपिलावर सुनावणी न घेता दिनांक २१-०२-२००९ रोजी निर्णय दिला. याची गंभीर दखल आयोग घेत आहे.

अपिलार्थी यांनी आयोगास सांगितले की, त्यांनी मागितलेल्या माहितीच्या झेरॉक्स प्रतीचा मोबदला देण्यास ते तयार आहेत. तसेच प्रथम अपिलीय अधिका-याने त्यांच्या अपिलावर सुनावणी घेतली नाही त्यामुळे त्यांना आता ही माहिती विनामूल्य मिळावी.

या प्रकरणामध्ये तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत व मुदतीनंतर सुध्दा माहिती अपिलार्थीस देऊ केली नाही हा प्रमाद झाला आहे. त्याचप्रमाणे जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेतली नाही हा सुध्दा त्यांच्या हातून कसूर झाला आहे. आज रोजी जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कबूल केले की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने मागितलेल्या ११ मुद्दयांवरील माहिती त्यांच्याकडे उपलब्ध आहे आणि त्याच्या झेरॉक्स प्रती ते अपिलार्थीस पुरवू शकतात. ही माहिती आता अपिलार्थीस विनामूल्य द्यावी लागेल. अपिलार्थीने मुद्दा क्रमांक १ व २ मध्ये छायाचित्र प्रती मागितल्या आहेत. असे छायाचित्र घेण्यात येत नाही त्यामुळे अशा छायाचित्र प्रती देता येणार नाहीत.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

१. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागितलेल्या संपूर्ण माहितीच्या झेरॉक्स प्रती त्यांना आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पुरवाव्या.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी (श्री. एस. आर. वाघ) यांच्याकडून माहिती अधिकार अधिनियमाचे पालन करण्यात कसूर झाला आहे व त्यामुळे त्यांना रुपये २५,००० रुपये शास्ती का लावण्यात येऊ नये याचा लेखी खुलासा त्यांनी आयोगास हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत सादर करावा.

३. विभागीय कृषि सह संचालक, औरंगाबाद यांनी त्यांच्या अधिपत्याखालील अधिकारी / कर्मचारी माहिती अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करतील याकरिता परिपत्रकव्दारे सर्वांना दक्ष राहण्याकरिता सूचित करावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १४-१२-२०१०** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. विकासकुमार बागडी, नाथ गल्ली, सदर बाजार, जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, जाफ्राबाद, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. श्री. एस. आर. वाघ, कृषि पर्यवेक्षक, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, जाफ्राबाद, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (नोंदणीकृत टपालाव्दारे)

४. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, जाफ्राबाद, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. विभागीय कृषि सह संचालक, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. संदिप गुलाबराव देशमुख, : अपीलकर्ता
मु. पो. पिंपळगाव रेणुकाई, तालुका भोकरदन,
जिल्हा जालना

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
रोपवन अधिकारी, कार्यालय सामाजिक वनीकरण विभाग,
भोकरदन, जिल्हा जालना

जन अपिलीय अधिकारी तथा :
उपंचालक, सामाजिक वनीकरण विभाग, जालना

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१८५९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १४-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा रोपवन अधिकारी, कार्यालय सामाजिक वनीकरण विभाग, भोकरदन, जिल्हा जालना | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा उपंचालक, सामाजिक वनीकरण विभाग, जालना | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०१-०७-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १३-०७-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९-१०-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०३-११-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३-११-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित आहेत.

आयोगापुढे असलेल्या कागदपत्रावरुन असे दृष्टोत्पत्तीस आले आहे की, जन माहिती अधिका-याने अपिलार्थीच्या दिनांक ०१-०७-२००९ रोजीच्या अर्जावर दिनांक १३-०७-२००९ रोजी अपिलार्थीस कळविले आहे की, माहितीच्या सत्यप्रती पुरविण्यासाठी रक्कम रुपये ३७८४ कार्यालयात भरावे यानंतर आपणास माहिती पाठविण्यात येईल. तथापि यानंतर अपिलार्थीने दिनांक २९-०७-२००९ रोजी जन माहिती अधिका-यास कळविले की, एवढी रक्कम भरणे त्यांच्या आवाक्याबाहेर असल्यामुळे माहितीचे निरीक्षण करण्याची त्यांच्या कार्यालयास व्यवस्था करावी यावरुन दिनांक ०९-११-२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस निरीक्षणासाठी त्यांच्या कार्यालयात बोलाविले होते तथापि त्यांना माहिती उपलब्ध झालेली दिसत नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी सुध्दा अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर निर्णय दिला आहे की, अर्जदार यांना त्यांच्या सोयीची तारीख रेकॉर्ड बघण्यासाठी कळवावी व त्यांना आवश्यक ती माहिती विनामूल्य पुरवावी.

आज रोजी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही उपस्थित नसल्यामुळे आयोगास सद्यस्थिती अवगत झाली नाही. तथापि याबाबत अपिलार्थीस पुन्हा एकदा संधी देण्यात यावी असे आयोगाचे मत आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

जन माहिती अधिका-याने अपिलार्थीच्या सोयीचा एक दिवस व वेळ निश्चित करुन त्या दिवशी त्यांनी मागितलेली माहिती निरीक्षणार्थ त्यांना (सकाळी ११-०० ते सायंकाळी ०५-०० वाजेपर्यंत) उपलब्ध करुन द्यावी व त्यातील अपिलार्थीस आवश्यक असलेल्या कागदपत्राच्या छायांकित प्रती विनामूल्य द्याव्यात. जन माहिती अधिकारी यांनी ही कार्यवाही आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक १४-१२-२०१०**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. संदिप गुलाबराव देशमुख, मु. पो. पिंपळगाव रेणुकाई, तालुका भोकरदन, जिल्हा जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा रोपवन अधिकारी, कार्यालय सामाजिक वनीकरण विभाग, भोकरदन, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपंचालक, सामाजिक वनीकरण विभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. दशरथ एकनाथ कांबळे,<br>रा. शास्त्री मोहल्ला, जुना जालना, तालुका जिल्हा जालना | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१८५८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १४-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. दशरथ एकनाथ कांबळे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना - श्री. सी. एम. बोरोळे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०७-०३-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८-०४-२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०८-०५-२००८ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०-०६-२००८ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिका-याने अपिलार्थीने मागितलेली सर्व माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध आहे असे सांगितले. तथापि मजुरांच्या हजेरीपटाच्या प्रतीकरिता अंदाजे ७०,००० रुपये खर्च लागणार आहे व त्याची उपलब्धता न झाल्यामुळे आतापर्यंत त्यांना अपिलार्थीस ही माहिती देता आली नाही. आयोगाच्या मते अपिलार्थीने मागितलेल्या सर्व माहितीच्या साक्षांकीत छायांकित प्रती अपिलार्थीस द्याव्यात फक्त मजुरांचे हजेरीपट निरीक्षण करण्यासाठी अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात उपलब्ध करुन द्यावे. यास अपिलार्थीने सुनावणीच्यावेळी सहमती दर्शविली.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

जन माहिती अधिका-याने अपिलार्थीने मागितलेल्या सर्व माहितीच्या साक्षांकीत छायांकीत प्रती वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवाव्यात व सर्व मजुरांचे हजेरीपट निरीक्षण करण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक २८-१२-२०१० रोजी सकाळी ११-०० ते सायंकाळी ०५-०० या वेळेत उपलब्ध करुन द्यावेत. अपिलार्थीने त्यातील प्रतीची मागणी केल्यास त्या अपिलार्थीस साक्षांकित करुन जन माहिती अधिकारी यांनी विनामूल्य पुरवाव्यात.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १४-१२-२०१०** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. दशरथ एकनाथ कांबळे, रा. शास्त्री मोहल्ला, जुना जालना, तालुका जिल्हा जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. धोंडीरामजी अन्नासाहेब देशमुख, : अपीलकर्ता
देहडकरवाडी, जुना जालना, जिल्हा जालना

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उप अभियंता, (स्थानिक स्तर) विभाग, जालना
जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता, (स्थानिक स्तर) जालना

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१८५७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १४-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, लघुपाटबंधारे उपविभाग, जालना - श्री. सोपान शंकरराव खिलारे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग (स्थानिक स्तर), जालना - श्री. एस. डी. बोरोळे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १२-०५-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २७-०७-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०६-११-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन माहिती अधिका-याने अपिलार्थी यांचा दिनांक १२-०५-२००९ रोजीचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर दिनांक १३-०५-२००९ रोजी अपिलार्थीने मागितलेल्या माहितीच्या झेरॉक्स प्रती देण्यापोटी रुपये १७२०० इतक्या रकमेचा भरणा करण्याचे अपिलार्थीस कळविले होते. त्यानंतर जन माहिती अधिका-याने याबाबत पुन्हा अपिलार्थीस स्मरणपत्र दिनांक १६-०८-२००९ रोजी दिले. तथापि अपिलार्थीने या शुल्काचा भरणा केला नाही. जन अपिलीय अधिका-याने अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दिनांक २५-०८-२००९ रोजी निर्णय दिला की, सुनावणीस कोणीही उपस्थित नसल्यामुळे अपील एकतर्फी निकाली काढण्यात येत आहे.

आज रोजी सुनावणीस अपिलार्थी उपस्थित नसल्यामुळे त्यांची बाजू आयोगास ऐकून घेता आली नाही. तथापि त्यांनी केलेल्या व्दितीय अपिलावरुन त्यांना माहिती मिळाली नाही ही बाब सिध्द होत आहे. जन माहिती अधिका-याने अपिलार्थीस आवश्यक त्या माहितीपोटीच्या रकमेचा भरणा करण्याचे दोनदा कळविले आहे असे आढळून येत आहे. या पार्श्वभूमीवर अपिलार्थीने मागितलेल्या माहितीची व्याप्ती मोठी असल्याकारणाने अपिलार्थीस कागदपत्रे निरीक्षणासाठी उपलब्ध करुन देण्याची संधी देण्यात यावी असे आयोगाचे मत आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

जन माहिती अधिका-याने अपिलार्थीस कागदपत्राच्या निरीक्षणासाठी एक दिवस निश्चित करुन तसे अपिलार्थीस कळवावे म्हणजे अपिलार्थी त्या दिवशी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित राहून त्यांनी मागितलेल्या माहितीचे निरीक्षण करु शकतील. ही कार्यवाही जन माहिती अधिका-याने आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १४-१२-२०१०** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. धोंडीरामजी अन्नासाहेब देशमुख, देहडकरवाडी, जुना जालना, जिल्हा जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, लघुपाटबंधारे उपविभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग (स्थानिक स्तर), जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. हनुमान वसंतराव माने,<br>मु. आनंदवाडी, तालुका परतूर, जिल्हा जालना | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, परतूर, जिल्हा जालना | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, परतूर, जिल्हा जालना | : | |
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१८५३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १४-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, परतूर, जिल्हा जालना - श्रीमती एम. पी. कुलकर्णी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, परतूर, जिल्हा जालना | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०२-०२-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | निरंक |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ३१-०३-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | निरंक |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०२-०७-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले की, अपिलार्थीस दिनांक ०१-०५-२००९ रोजी माहिती पुरविण्यात आलेली आहे व याबाबतची पोचही अपिलार्थीने दिलेली आहे.

आज रोजी आयोगास जन माहिती अधिका-याने अपिलार्थीच्या दिनांक १५-०७-२०१० रोजीच्या पत्राची तसेच तहसील कार्यालयामार्फत लिहिलेल्या दिनांक २९-०७-२०१० रोजीच्या पत्राची प्रतही सादर केली. अपिलार्थीने दिनांक १५-०७-२०१० रोजी आयोगास लिहिलेले पत्र आयोगासमोर आहे. त्यांना माहिती मिळाली असल्याकारणाने अपील निकाली काढण्याची त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १४-१२-२०१०**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. हनुमान वसंतराव माने, मु. आनंदवाडी, तालुका परतूर, जिल्हा जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, परतूर, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, परतूर, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सय्यद नदीम सय्यद फहीम, : अपीलकर्ता
दाना बाजार, जालना

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, घनसावंगी, जिल्हा जालना

जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक २, जालना

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१८५१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १४-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, घनसावंगी, जिल्हा जालना - श्री. कांडलीकर एम. जी. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक २, जालना - प्रतिनिधी - श्री. पवार एस. एम., उप कार्यकारी अभियंता (प्र.) | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १४-०७-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | निरंक |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २६-१०-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २९-१०-२००९ |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ११-१२-२००९

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले की, अपिलार्थी यांना त्यांनी मागितलेली संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात येऊन नेण्याचे दिनांक १५-०७-२०१० च्या पत्रान्वये कळविण्यात आले होते. त्यानुसार अपिलार्थी यांनी त्यांच्या कार्यालयात उपस्थित राहून माहिती प्राप्त केली व याबाबतची पोच अपिलार्थीने दिनांक १९-०८-२०१० रोजी उप विभागीय अभियंता, घनसावंगी यांना दिली आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत त्यामुळे त्यांची बाजू ऐकून घेता आली नाही. तथापि त्यांना माहिती मिळाली आहे असे आयोगास सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिका-याने सांगितले व अपिलार्थीची पोचही दाखविली आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १४-१२-२०१०** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सय्यद नदीम सय्यद फहीम, दाना बाजार, जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, घनसावंगी, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग

क्रमांक २,  जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. शेख सादेख शेख वाहेद,<br>रा. फुलेनगर, केज, तालुका केज, जिल्हा बीड | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, परभणी | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, परभणी | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१६६५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १५-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, परभणी - प्रतिनिधी - श्री. शेख शिराज, कनिष्ठ सहायक | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, परभणी - श्री. अशोक इ. आठवले | : | उपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष - कामेल उर्दू प्राथमिक शाळा | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २०-०६-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २९-०७-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २८-१०-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व जन अपिलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास सांगितले की, अपिलार्थीच्या अर्जावर दिनांक २९-०७-२००९ रोजी अपिलार्थीस अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगव्दारे माहिती पाठविली आहे त्याची पावती त्यांच्या नस्तीवर आहे. त्याचप्रमाणे दुस-यांदा दिनांक २२-१२-२००९ रोजी त्याच माहितीच्या झेरॉक्स प्रती अपिलार्थीस स्पीड पोस्टाने पाठविल्या. त्याच्या टपालाची पावती आयोगास सादर केली. पाठविलेल्या माहितीची एकूण पृष्ठे ११० आहेत. दुस-या वेळेस सुध्दा सदरच्या माहितीचा एक संच पाठविण्यात आला. आज रोजी अपिलार्थी उपस्थित नाहीत त्यामुळे त्यांची बाजू आयोगास ऐकून घेता आली नाही. तथापि आयोगासमोरील पुराव्यावरुन अपील निकाली काढण्यायोग्य आहे या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

या सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १५-१२-२०१०** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख सादेख शेख वाहेद, रा. फुलेनगर, केज, तालुका केज, जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. नारायण उत्तमराव मते, : अपीलकर्ता
रा. देवहिवरा, पो. तालुका घनसावंगी, जिल्हा जालना

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
तालुका कृषि अधिकारी कार्यालय, घनसावंगी,
तालुका घनसावंगी, जिल्हा जालना
जन अपिलीय अधिकारी, :
तालुका कृषि अधिकारी कार्यालय, घनसावंगी,
तालुका घनसावंगी, जिल्हा जालना

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१६७६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १५-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. नारायण उत्तमराव मते | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, घनसावंगी, तालुका घनसावंगी, जिल्हा जालना - श्री. सय्यद वाय. एम. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, घनसावंगी, तालुका घनसावंगी, जिल्हा जालना - श्री. व्ही. के. कुलकर्णी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २८-०४-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९-०६-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |

८	राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख	दि.  २६-१०-२००९

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व त्यांचे सहायक, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले की, त्यांच्या कार्यालयाने अपिलार्थीस माहितीपोटीचे शुल्क रुपये ७५०० इतके भरण्यास सांगितले होते. त्याप्रमाणे अपिलार्थीने शुल्क भरले. अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांच्याकडे तयार आहे व ते ती अपिलार्थीस देऊ शकतात.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी ३७५० छायांकित प्रतींची माहिती अपिलार्थीस दिली. अपिलार्थीने ती माहिती स्विकारली. अपिलार्थीस अजूनही माहितीची आवश्यकता आहे, असे त्यांनी सांगितले. ही माहिती फार व्यापक प्रमाणात आहे. त्यासाठी रुपये २५४३० इतके शुल्क आवश्यक आहे. तथापि या मागितलेल्या उर्वरीत माहितीबाबत आयोगाचे मत असे आहे की, अपिलार्थीने सदरच्या माहितीचे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात जाऊन निरीक्षण करावे. अपिलार्थीने त्यास सुनावणीच्यावेळी सहमती दर्शविली.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

जन माहिती अधिका-याने अपिलार्थी यांनी मागितलेल्या उर्वरीत माहितीबाबत त्यांच्या कार्यालयात विनामूल्य निरीक्षण करण्यासाठी तीन दिवसांच्या कालावधीची तारीख व वेळ निश्चित करुन द्यावी. निरीक्षणानंतर अपिलार्थीस माहितीची आवश्यकता वाटल्यास,काही कागदपत्रांच्या छायांकित प्रती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विनामूल्य पुरवाव्यात. ही कार्यवाही आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद**		**राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक	१५-१२-२०१०**		**खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. नारायण उत्तमराव मते, रा. देवहिवरा, पो. तालुका घनसावंगी, जिल्हा जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, घनसावंगी, तालुका घनसावंगी, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, घनसावंगी, तालुका घनसावंगी, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. शेख खाजा शेख अमीर,<br>शेख नरिमाननगर, रेल्वेस्टेशनजवळ, जालना | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>तालुका कृषि अधिकारी कार्यालय, जालना | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>तालुका कृषि अधिकारी, सामनगाव, जालना | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१८१४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १५-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, जालना - श्री. एस. जे. काकडे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, जालना - श्री. चंद्रसेन कचरुसिंग बहुरे | : | उपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष श्री. धोत्रे (कृ. स.) | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १३-०७-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १३-०८-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६-१२-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती त्यांना दिनांक ३१-०८-२००९ रोजी दिलेली आहे. याबाबतची नोंद प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ३१-०८-२००९ रोजीच्या निर्णयाच्या वेळी घेतली आहे. अपिलार्थींची यावर सही असल्याचे आयोगास आढळून आले आहे. त्याचप्रमाणे आज रोजी आयोगापुढे अपिलार्थीचे दिनांक ०४-१२-२०१० रोजीचे पत्र आहे. ज्याअन्वये त्यांनी आयोगास असे कळविले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली आहे व प्रस्तुत व्दितीय अपील रद्द करण्यात यावे अशी आयोगास विनंती केली आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १५-१२-२०१०** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख खाजा शेख अमीर, शेख नरिमाननगर, रेल्वेस्टेशनजवळ, जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. भाई संजय शिवाजीराव महाद्वार, : अपीलकर्ता
रा. रंगार गल्ली, विठ्ठल मंदिर चौक, बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
मुख्य लेखा व वित्त विभाग, जिल्हा परिषद, बीड
जन अपिलीय अधिकारी तथा :
अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१६२९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १५-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. भाई संजय शिवाजी महाद्वार | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लेखाधिकारी, वित्त विभाग, जिल्हा परिषद, बीड - श्री. लिंगनवाड आर. बी. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य लेखा व वित्त अधिकारी, वित्त विभाग, जिल्हा परिषद, बीड - प्रतिनिधी - श्री. लिंगनवाड आर. बी., वरिष्ठ लेखाधिकारी, वित्त विभाग,जि.प.बीड | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २९-०१-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ३१-०१-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०-०३-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०४-०५-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१-०७-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

अपिलार्थीने दिनांक २९-०१-२००९ रोजीच्या अर्जामध्ये सन २००७-०८, ०९ या कालावधीशी संबंधित एकूण ९ मुद्दयांवरील विविध माहिती मागितली होती. जी जिल्हा

परिषदेमधील सुमारे ८ खातेप्रमुखांशी संबंधित आहे. त्यांना आजपावेतो फक्त खालील अधिका-यांकडून माहिती प्राप्त झाली आहे.

१. शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, बीड

२. महिला व बालकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, बीड

३. कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद, बीड

४. कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, बीड

तथापि ही माहिती अपूर्ण आहे असे अपिलार्थीचे म्हणणे आहे. उर्वरीत खातेप्रमुखांकडून त्यांना माहिती प्राप्त झालेली नाही. अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २७-०४-२००९ रोजी सुनावणी घेऊन मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांनी संबंधित खातेप्रमुख यांच्याकडून माहिती संकलीत करुन अपिलार्थीस विहित मुदतीत पुरवावी असे आदेशित केले होते. तथापि यावर आजपावेतो कार्यवाही झालेली दिसत नाही.

अपिलार्थीने मागितलेली माहिती प्रामुख्याने जिल्हा परिषदेशी संबंधित आहे व जिल्हा परिषदेअंतर्गत वेगवेगळ्या विभागात ही माहिती उपलब्ध आहे. यामुळे जन माहिती अधिकारी यांनी संबंधित विभाग प्रमुखांकडून ही माहिती प्राप्त करुन अपिलार्थीस देणे आवश्यक होते असे आयोगाचे मत आहे. माहितीची व्याप्ती मोठ्या प्रमाणात आहे ही बाब विचारात घेता काही कालावधी लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे विलंब लागला आहे.आता मात्र अपिलार्थीस उर्वरीत माहिती जन माहिती अधिकारी ज्यांच्याकडे प्रथम अर्ज आला त्यांनी त्वरीत पुरवावी. माहिती प्राप्त झाल्यावर अपिलार्थी यांनी माहितीची पडताळणी करावी व अजून काही माहिती प्राप्त व्हावयाची असेल तर त्याप्रमाणे माहितीच्या कागदपत्रांची मागणी करावी. या पार्श्वभूमीवर आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लेखाधिकारी, वित्त विभाग, जिल्हा परिषद, बीड यांनी अपिलार्थीने मागितलेली व त्यांना अद्यापपावेतो प्राप्त न झालेली उर्वरीत माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत संबंधित खातेप्रमुखांकडून प्राप्त करुन घेऊन ती अपिलार्थीस विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पुरवावी. तसेच आतापर्यंत अपिलार्थीस प्राप्त झालेल्या माहितीमध्ये काही माहिती अपूर्ण असल्यास व त्याप्रमाणे अपिलार्थीने मागणी केल्यास माहितीच्या कागदपत्राच्या छायांकीत साक्षांकीत प्रती नोंदणीकृत टपालाने विनामूल्य पुरवाव्यात.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १५-१२-२०१०** **खंडपीठ औरंगाबाद**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. भाई संजय शिवाजीराव महाद्वार, रा. रंगार गल्ली, विठ्ठल मंदिर चौक, बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लेखाधिकारी, वित्त विभाग, जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य लेखा व वित्त अधिकारी, वित्त विभाग, जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. गणेश साहेबराव लांडगे, : अपीलकर्ता
पंचशिलनगर (मंजरथ रोड), माजलगाव, जिल्हा बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
पंचायत समिती कार्यालय, माजलगाव, जिल्हा बीड
जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१६४४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १५-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधीक्षक, पंचायत समिती कार्यालय, माजलगाव, जिल्हा बीड - श्री. येवले ए. के. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, माजलगाव, जिल्हा बीड - श्री. विनय के. ठमके | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०९-०१-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०१-०६-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०२-०७-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८-०८-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले की, अपिलार्थीने मागितलेली माहिती गोळा करण्यासाठी त्यांना काही कालावधी लागला पण प्रयत्न करुन त्यांनी ही माहिती गोळा केलेली आहे व जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांनी दिनांक २९-०६-२००९ रोजी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेताना दिलेल्या निर्णयानुसार त्याच दिवशी म्हणजे दिनांक २९-०६-२००९ रोजी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनीही आयोगास सांगितले की, प्रथम अपील सुनावणीपूर्वीच म्हणजे दिनांक २७-०२-२००९ रोजी जन माहिती अधिका-याने अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाने माहिती पाठविली होती परंतु ती अपिलार्थीकडून परत आली आहे. आयोगास आज रोजी पोस्टाने परत आलेले माहितीचे बंद पाकीट दाखविण्यात आले व यावर माहिती घेण्यास नाकारले अशी पोस्टाची नोंद आहे. या सर्व बाबीवरुन आयोगाच्या असे दृष्टोत्पत्तीस आले आहे की, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पुरविण्याचा प्रयत्न केला आहे तथापि अपिलार्थीने माहिती घेतली नाही. आज रोजी अपिलार्थी उपस्थित नाहीत त्यामुळे त्यांची बाजू आयोगास ऐकून घेता आली नाही. तथापि कागदपत्राच्या पुराव्यावरुन प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य आहे असे आयोगाचे मत झाले आहे. या पार्श्वभूमीवर आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील फेटाळण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १५-१२-२०१०**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. गणेश साहेबराव लांडगे, पंचशिलनगर (मंजरथ रोड), माजलगाव, जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधीक्षक, पंचायत समिती कार्यालय, माजलगाव, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, माजलगाव, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. शामराव नारायणराव नागरगोजे, | : | अपीलकर्ता |
| | रा. यशवंतराव चव्हाण नाट्यगृहाजवळ, म्यु. घर नं. १-२-१७०, आनंदनगर, कॅनॉल रोड (द.) बीड, तालुका जिल्हा बीड | | |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा | : | उत्तरवादी |
| | तलाठी, सजा थेरला, तालुका पाटोदा, जिल्हा बीड | | |
| | जन अपिलीय अधिकारी तथा | : | |
| | तहसीलदार, तहसील कार्यालय, पाटोदा, जिल्हा बीड | | |
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१६४७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १५-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा | : | अनुपस्थित |
| | तलाठी, सजा थेरला, तालुका पाटोदा, जिल्हा बीड | | |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा | : | अनुपस्थित |
| | तहसीलदार, तहसील कार्यालय, पाटोदा, जिल्हा बीड | | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०५-०९-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ३१-१२-२००८ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २३-१०-२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २६-१२-२००८ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६-०२-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी उपस्थित नाहीत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे उपस्थित नाहीत. त्यांची बाजू ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटते. याकरिता सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी व्यक्तिशः उपस्थित राहणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरीम आदेश**

या व्दितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणी दिनांक ०६-०१-२०११ रोजी दुपारी ०३-०० वाजता ठेवण्यात येत आहे. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) सुनावणीस व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक १५-१२-२०१०**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शामराव नारायणराव नागरगोजे, रा. यशवंतराव चव्हाण नाट्यगृहाजवळ, म्यु. घर नं. १-२-१७०, आनंदनगर, कॅनॉल रोड (द.) बीड, तालुका जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा तलाठी, सजा थेरला, तालुका पाटोदा, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, पाटोदा, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. निलेश बाळासाहेब जोशी,<br>'मातोश्री निवास', पोल फॅक्ट्रीमागे, जालना रोड, बीड | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>तहसीलदार, तहसील कार्यालय,आष्टी, तालुका आष्टी, जिल्हा बीड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, आष्टी, तालुका आष्टी, जिल्हा बीड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१६५९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १५-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, आष्टी, तालुका आष्टी, जिल्हा बीड | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, आष्टी, तालुका आष्टी, जिल्हा बीड | : | अनुपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष - श्री. राजाराम रामचंद्र वेदपाठक | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २२-११-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १९-०१-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६-०३-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे सांगितले की, ॲडव्होकेट जोशी यांनी श्री. राजाराम रामचंद्र वेदपाठक, रा. खडकत, तालुका आष्टी, जिल्हा बीड यांच्या

जमिनीच्या संदर्भात माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार अर्ज केलेला आहे. जन माहिती अधिका-याने असेही सांगितले की, ॲडव्होकेट श्री. जोशी हे श्री. राजाराम रामचंद्र वेदपाठक यांच्यातर्फे या प्रकरणात कामकाज पहात आहेत. दिनांक १३-१२-२०१० रोजी श्री. राजाराम रामचंद्र वेदपाठक यांना सर्व माहिती पुरविण्यात आली असून या बाबतची पोच श्री. राजाराम रामचंद्र वेदपाठक यांनी दिलेली आहे. त्याची झेरॉक्स प्रत जन माहिती अधिकारी यांनी आज रोजी आयोगास सादर केली.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, श्री. राजाराम रामचंद्र वेदपाठक यांच्यातर्फे ॲडव्होकेट श्री. जोशी काम पहात आहेत तथापि त्यांचा वकीलनामा आढळून येत नाही त्यामुळे ॲडव्होकेट श्री. जोशी यांनी सदरचा माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत चा अर्ज केला आहे असे दिसत आहे. त्यामुळेच जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, आष्टी यांना आयोगाचे निर्देश आहेत की, त्यांनी या माहितीच्या एका संचाच्या साक्षांकीत छायांकित प्रती ॲडव्होकेट श्री. जोशी यांना आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाने विनामूल्य पाठवाव्यात.

या प्रकरणात दिनांक २२-११-२००८ रोजी अपिलार्थीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे आलेला आहे. अपिलार्थीस माहिती पुरविण्यासाठी सुमारे दोन वर्षाचा कालावधी लागलेला आहे. सध्याचे जन माहिती अधिकारी यांचा यातील कालावधी एक वर्षाचा आहे. यापूर्वी श्री. संजय पवार हे नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, आष्टी या पदावर कार्यरत होते. त्यांनी अशा प्रकारचा विलंब भविष्यात होणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक राहील. तसेच जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, आष्टी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय दिल्याचे आयोगासमोरील उपलब्ध कागदपत्रांवरुन दिसून येत नाही, ही बाब गंभीर आहे. तत्कालीन तहसीलदार, आष्टी श्री. पी. के. कुरडे यांनी भविष्यात दक्ष राहणे आवश्यक होईल.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी किंवा त्यांचे वकील उपस्थित नाहीत, त्यामुळे त्यांची बाजू आयोगास ऐकून घेता आली नाही. तथापि उपरोक्त बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १५-१२-२०१०**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. निलेश बाळासाहेब जोशी, 'मातोश्री निवास', पोल फॅक्ट्रीमागे, जालना रोड, बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, आष्टी, तालुका आष्टी, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, आष्टी, तालुका आष्टी, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सिध्देश्वर बद्रीनाथ उबाळे, : अपीलकर्ता
मु. पो. कांवदी गल्ली, अंबड, तालुका अंबड,
जिल्हा जालना

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उप विभागीय अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर)
उपविभाग, कार्यालय, घनसावंगी, तालुका घनसावंगी,
जिल्हा जालना

जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग,
जालना

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००८/रामाआ/अपील/सिआर/२३२५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १५-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. सिध्देश्वर बद्रीनाथ उबाळे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, कार्यालय, घनसावंगी, तालुका घनसावंगी, जिल्हा जालना | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २०-०५-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०१-०७-२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २२-०७-२००८ |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १७-१२-२००८

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे उपस्थित नाहीत ही गंभीर बाब आहे आणि आयोगाने याची दखल घेतली आहे. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांची बाजू आयोगास ऐकणे जरुरीचे आहे. याकरिता सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी व्यक्तिशः उपस्थित राहणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>अंतरीम आदेश</u>**

या व्दितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणी दिनांक ०६-०१-२०११ रोजी दुपारी ०३-०० वाजता ठेवण्यात येत आहे. पुढील सुनावणीस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) सुनावणीस व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १५-१२-२०१०** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सिध्देश्वर बद्रीनाथ उबाळे, मु. पो. कांवदी गल्ली, अंबड, तालुका अंबड, जिल्हा जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, कार्यालय, घनसावंगी, तालुका घनसावंगी, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. अभयकुमार बलिराम यादव,<br>रहेमानगंज, रामचंद्र आर्य चौक, जालना | : | अपीलकर्ता |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| जन माहिती अधिकारी,<br>कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग<br>क्रमांक १, जालना | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग<br>क्रमांक १, जालना | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१८३८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १५-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. अभयकुमार बलिराम यादव | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उप विभागीय अभियंते (एकूण उपविभाग-५), उत्तर, जालना / क्रमांक ३, जालना / बदनापूर / भोकरदन / जाफ्राबाद - प्रतिनिधी - श्री. पी. एच. कोपेवार, वरिष्ठ लिपिक, उपविभाग (उत्तर), जालना | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जालना - प्रतिनिधी - श्री. क. भि. गायकवाड, उप कार्यकारी अभियंता | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २९-०४-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०४-०५-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८-०६-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २४-०७-२००९ |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २२-०९-२००९

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सा.बां. उपविभाग (उत्तर) जालना यांचे यांचे प्रतिनिधी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधींचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २९-०४-२००९ रोजीच्या अर्जान्वये मागणी केलेली माहिती विहित मुदतीत दिनांक ०४-०५-२००९ रोजीच्या पत्राद्वारे सर्व सहायक अभियंते व उप विभागीय अभियंते यांची अपिलार्थीस माहिती देण्याचे कळवून त्याची प्रत अपिलार्थीला दिली आहे, असे आयोगापुढे सांगितले. जन अपिलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रथम अपिलावर दिनांक १५-०७-२००९ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थीस सर्व उप विभागीय अभियंत्यांना त्वरीत माहिती देण्यात यावी असे निर्देश दिले.

आयोगासमोर आज रोजी जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जालना यांनी सादर केलेल्या अहवालावरुन असे दिसते की, सार्वजनिक बांधकाम उपविभाग (उत्तर), जालना यांनी दिनांक १६-०७-२००९ रोजीच्या पत्राद्वारे व सार्वजनिक बांधकाम उपविभाग, बदनापूर यांनी दिनांक २५-०६-२००९ रोजी माहिती पुरविली आहे.उर्वरीत तीन उपविभाग जाफ्राबाद भोकरदन, क्रमांक ३, जालना यांची माहिती अपिलार्थीस देण्यात आली आहे. असे कार्यकारी अभियंता यांनी दिनांक १४-१२-२०१० रोजी राज्य माहिती आयेगास सादर केलेल्या अहवालावरुन आढळून येत अहे. त्याचप्रमाणे आयोगासमोर अपिलार्थीचा दिनांक ०९-१२-२०१० यासंदर्भातील अर्ज असून त्यांना आता सर्व जन माहिती अधिकारी कडून मागितलेली माहिती प्राप्त झाली आहे असे आढळून येत आहे. व प्रस्तुत अपील रद्द करण्यात यावे अशी अपिलार्थीने आयोगास विनंती केली आहे. वरील पार्श्वभूमीवर आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १५-१२-२०१०** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अभयकुमार बलिराम यादव, रहेमानगंज, रामचंद्र आर्य चौक, जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सा.बां.उपविभाग (उत्तर) जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. जनार्दन दत्तात्रय साळी,<br>एस. टी. कॉलनी, नाईक वाडा, स्वंयवर मंगल कार्यालयाजवळ, जालना | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>जिल्हा पोलीस अधीक्षक, परभणी | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा पोलीस अधीक्षक, परभणी | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१८२६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १५-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा पोलीस उप अधीक्षक (गृह), पोलीस अधीक्षक कार्यालय, परभणी - प्रतिनिधी - श्री. ए. जी.पठाण, हवालदार | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, परभणी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १०-०८-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २२-०९-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १९-११-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयाचे पोलीस हवालदार श्री. ए. जी. पठाण यांच्यामार्फत आयोगास कागदपत्रे सादर केली आहेत. जन माहिती अधिकारी तथा पोलीस उप अधीक्षक (गृह), पोलीस अधीक्षक कार्यालय, परभणी यांनी हिवाळी अधिवेशन चालू असून त्या कामकाजामुळे मुख्यालयी उपस्थित राहणे आवश्यक आहे त्यामुळे प्रतिनिधी पाठविण्यात येत आहे असे आयोगास कळविले. जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे कोणीही उपस्थित नाही.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन असे आढळून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक १०-०८-२००९ रोजीच्या अर्जावर अपिलार्थीस रुपये २२ चा भरणा करावा म्हणजे माहिती पाठविता येईल असे दिनांक २९-०८-२००९ रोजी कळविले आहे. तथापि अपिलार्थीने याबाबत पुढील कार्यवाही केलेली नाही. अपिलार्थीने प्रथम अपील दिनांक २२-०९-२००९ रोजी जिल्हा पोलीस अधीक्षक, परभणी यांच्याकडे सादर केले. यावर अपर पोलीस अधीक्षक, परभणी तथा प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २९-१०-२००९ रोजी अर्जदारास कागदपत्राच्या नकला नियमानुसार त्वरीत देण्यात याव्यात असे पत्र पोलीस उप अधीक्षक (गृह), जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय, परभणी यांना पाठविले. यानुसार पुन्हा एकदा जन माहिती अधिकारी तथा पोलीस उप अधीक्षक (गृह), यांनी दिनांक ३१-१०-२००९ रोजी अपिलार्थीस माहिती पाठविण्यापोटी येणारा खर्च मनीऑर्डरव्दारे पाठवावा असे कळविले. जन माहिती अधिकारी यांच्याकडे ही माहिती उपलब्ध आहे. त्यांनी माहितीचा एक संच आज आयोगास सादर केला. अपिलार्थी यांना वेळोवेळी जन माहिती अधिकारी यांनी कल्पना देऊन सुध्दा त्यांनी आवश्यक त्या माहितीपोटीच्या शुल्काचा भरणा केलेला नाही. या पार्श्वभूमीवर आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

अपील फेटाळण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १५-१२-२०१०**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. जनार्दन दत्तात्रय साळी, एस. टी. कॉलनी, नाईक वाडा, स्वंयवर मंगल

कार्यालयाजवळ, जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा पोलीस उप अधीक्षक (गृह), पोलीस अधीक्षक कार्यालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. सय्यद नदीम सय्यद फहीम,<br>दाना बाजार, जालना | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग उत्तर, जालना | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक १, जालना | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१८१८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १५-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी श्री. सय्यद नदीम सय्यद फहीम | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग उत्तर, जालना - प्रतिनिधी - श्री. पी. एच. कोपेकर, वरिष्ठ लिपिक | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक १, जालना - प्रतिनिधी - श्री. क. भि. गायकवाड, उप कार्यकारी अभियंता | : | उपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष - श्री. आर. आर. जैस्वाल | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २४-०७-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३१-०८-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ११-१२-२००९

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता हे नागपूर येथे अधिवेशनासाठी गेल्यामुळे अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांच्या अनुपस्थितीबद्दल आयोगाने नाराजी व्यक्त केली.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास सांगितले की, अपिलार्थीने मागितलेली काही माहिती त्यांनी दिनांक १७-११-२००९ रोजी दिली आहे.

यामध्ये कामांची यादी, कामांची अंदाजपत्रके (१३) च्या झेरॉक्स प्रती, कार्यारंभ आदेश (१२) प्रती, ८ कामांच्या मोजमाप पुस्तिकांच्या झेरॉक्स प्रती ही माहिती दिली आहे. एजन्सीची नावे, क्वालिटी रिपोर्ट ही माहिती दिलेली नाही, ती आता द्यावी लागेल, असे आयोगाचे मत आहे.

अपिलार्थीने श्री. जैस्वाल, उप अभियंता यांच्या अधिपत्याखालील माहिती मागितली होती. तथापि श्री. शेख अली व श्री. तोबरे यांनी हाताळलेल्या कामाची माहिती मिळाली आहे. श्री. गायकवाड, श्री. कोल्हे या कनिष्ठ अभियंत्याची माहिती त्यामध्ये नाही असे अपिलार्थीने सांगितले.तथापि जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने सांगितले की सर्वांची माहिती दिली आहे. या पार्श्वभूमीवर सर्व कनिष्ठ अभियंत्यांनी केलेल्या कामाबद्दलची उपरोक्त माहिती उपविभागीय कार्यालयात एकत्रित करुन त्या माहितीचे निरीक्षण अपिलार्थीस द्यावे, असे आयोगाचे मत आहे व अपिलार्थीने यांना हे मान्य आहे व निरीक्षणानंतर अपिलार्थीस आवश्यक त्या झेरॉक्स प्रती जन माहिती अधिकारी यांना विनामूल्य द्याव्या लागतील. श्री. जैस्वाल आर. आर., उप विभागीय अभियंता यांनी शासनास सादर केलेल्या मूळ संचिकाच्या झेरॉक्स प्रती उपविभागात उपलब्ध असणे शक्य नाही ही बाब अपिलार्थीने मान्य केली आहे. त्यामुळे या प्रश्नावर अपिलार्थीस माहिती देण्याची आवश्यकता नाही.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

<u>**आदेश**</u>

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस वर नमूद केल्याप्रमाणे उर्वरीत माहितीच्या निरीक्षणार्थ तारीख व वेळ निश्चित करुन हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत कळवावे व अपिलार्थीने मागितलेली माहिती निरीक्षणासाठी उपलब्ध करुन द्यावी व निरीक्षणानंतर अपिलार्थीस आवश्यक असलेल्या कागदपत्राच्या झेरॉक्स प्रती विनामूल्य द्याव्यात.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १५-१२-२०१०** **खंडपीठ औरंगाबाद**

--------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सय्यद नदीम सय्यद फहीम, दाना बाजार, जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग उत्तर, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक १, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. संजय जवाहरलाल गुप्ता,<br>मु. पो. पिंपळगांव रेणुकाई, तालुका भोकरदन, जिल्हा जालना | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>कृषि अधिकारी कार्यालय, भोकरदन, जिल्हा जालना | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, भोकरदन, जिल्हा जालना | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१८१५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १५-१२-२०१० |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, भोकरदन, जिल्हा जालना - प्रतिनिधी- श्री. एम. ए. बाकी,मंडळ कृषि अधिकारी - | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, भोकरदन, जिल्हा जालना - श्री. बोईनवाड माधव सुभाषराव | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८-०६-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३-०७-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३-११-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी हे प्रशिक्षणासाठी गेले आहेत असे त्यांच्या प्रतिनिधीने आज रोजी सुनावणीच्या वेळी आयोगास सांगितले. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व जन अपिलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास सांगितले की, अपिलार्थीच्या दिनांक ०८-०६-२००९ रोजीच्या अर्जावर त्यांना दिनांक ०१-०७-२००९ रोजी रुपये ११५० इतक्या शुल्काचा भरणा करुन माहिती घेऊन जाण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी निर्णय दिला की, अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्यात यावी व त्याप्रमाणे दिनांक ०९-१०-२००९ रोजी अपिलार्थीस व्यक्तिशः माहिती देण्यात आली. अर्जदाराने माहिती प्राप्त झाल्याची पोच दिली असून ९ अंदाजपत्रकाच्या प्रती मिळणे बाकी आहे असेही नमूद केले. ही माहिती वरिष्ठ कार्यालयाकडून प्राप्त करुन घेऊन देण्यात येईल असे जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०९-१०-२००९ रोजी अपिलार्थीस कळविले. जन माहिती अधिका-याने दिनांक १५-०५-२०१० रोजी माहिती आता उपलब्ध असून समक्ष घेऊन जावी असे अपिलार्थीस कळविले.

आज रोजी ही माहिती जन माहिती अधिका-याकडे उपलब्ध आहे. त्यांनी ती आयोगास दाखविली. ही माहिती जन माहिती अधिकारी अपिलार्थीस पाठवू शकतात. या पार्श्वभूमीवर आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागितलेल्या माहितीतील उर्वरीत माहिती - नऊ अंदाजपत्रकाच्या साक्षांकीत छायांकित प्रती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाने विनामूल्य पुरवाव्यात.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक १५-१२-२०१०**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. संजय जवाहरलाल गुप्ता, मु. पो. पिंपळगांव रेणुकाई, तालुका भोकरदन, जिल्हा जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, भोकरदन, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, भोकरदन, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.